cmyk

## संपादकीय

### शेतकऱ्यांच्या कंठाशी आले तरी यंत्रणा सुस्त

अतिवृष्टी बाधितांसाठी सरकारने जाहीर केलेली अनेक शेतकर्‍यांची मदत सध्या तरी लालफितीत अडकली आहे. या रकमेचा आकडा तब्बल साडेतीनशे कोटींपेक्षा जास्त आहे. याचे सविस्तर वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. अतिपावसाने झोडपल्यानंतर मुख्यमंत्र्यांसहित अनेक मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधांचे दौरे केले. नुकसानीची पाहणी केली.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२६ | शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### केंद्र सरकार मनरेगा योजनेचे नाव बदलणार?

नवी दिल्लीः केंद्र सरकार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी योजना म्हणजेच मनरेगाचे नाव बदलण्याचा विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांनुसार, या महत्त्वाकांक्षी योजनेचे नाव बदलून पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना ठेवले जाण्याची शक्यता आहे. मनरेगा योजना ग्रामीण भागातील लोकांना रोजगार पुरवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेला एक महत्त्वाचा सरकारी उपक्रम आहे. मनरेगा कायदा ऑगस्ट २००५ मध्ये पास करण्यात आला, ज्यानुसार कामाचा अधिकार मिळतो. एप्रिल २००८ पासून ही योजना संपूर्ण भारतात लागू झाली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला १०० दिवसांचा रोजगार देण्याची तरतूद आहे. योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत असते. रोजगार शोधणाऱ्यांना पाच किलोमीटरच्या परिघात काम दिले जाते आणि त्यासाठी किमान वेतन दिले जाते.

### राजस्थानात शेतकऱ्यांचे आंदोलन चिघळले

जयपूरः हनुमानगडमध्ये इथेनॉल फॅक्टरीवरून सुरू असलेल्या विरोध-प्रदर्शनात तणाव वाढण्याची शक्यता आहे. काँग्रेस नेते आणि शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे की मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू राहील. गुरुवार सकाळपासून शेतकऱ्यांनी प्रदर्शन स्थळाजवळील गुरुद्वारामध्ये पोहोचण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्याच्या टिब्बी परिसरात इंटरनेट बंद आहे. तर, फॅक्टरीच्या आसपास राहणारे सुमारे ३० कुटुंबे घर सोडून पळून गेले आहेत. शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील राठीखेडा गावात निर्माणाधीन ड्यून इथेनॉल प्रायव्हेट लिमिटेड फॅक्टरीची भिंत तोडली. आत घुसलेल्या आंदोलकांनी ऑफिसलाही आग लावली. यानंतर पोलिस आणि शेतकऱ्यांमध्ये जोरदार दगडफेक झाली. लाठीचार्ज आणि अश्रुधुराचे गोळे फेकल्याने संतप्त शेतकऱ्यांनी १४ गाड्या जाळल्या.

### ९ लाख भारतीयांनी नागरिकत्व सोडले

दिल्लीः भारतीय नागरिकांमध्ये परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत असले, तरी गेल्या काही वर्षांत परदेशात होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांनी अनेकांना धक्का बसला आहे. त्यामुळे आता भारतीय अधिक सावध होत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. केंद्र सरकारने माहिती दिली की, गेल्या तीन वर्षांत भारतीय नागरिकत्व सोडणाऱ्यांची संख्या सुमारे ५ टक्क्यांनी कमी झाली आहे. सरकारने राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये एकूण २,०६,३७८ व्यक्तींनी भारतीय नागरिकत्व सोडले आहे. २०२३ मध्ये ही संख्या २,१६,२१९, तर २०२२ मध्ये २,२५,६२० होती. म्हणजेच सलग तीन वर्षे ही संख्या घसरताना दिसत आहे. केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत ८,९६,८४३ भारतीयांनी भारताचे नागरिकत्व सोडले आहे.

### गोवा जळीत कांड : अखेर लुथरा ब्रदर्सना अटक

बँकॉकः गोव्यातील अर्पोरा इथल्या बर्च बाय रोमिओ लेन नाईट क्लबमध्ये ६ डिसेंबर रोजी भीषण आग लागली होती. या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर क्लबशी संबंधित असलेले गौरव लुथरा आणि सौरभ लुथरा देश सोडून पळून गेले होते. त्या दोघांना आता थायलंडमधून अटक करण्यात आली असून त्यांना भारतात परत आणण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी इंटरपोलने ब्लू कॉर्नर नोटीस जारी केली आहे. भारत आणि गोवा पोलिसांनी संयुक्तपणे प्रत्यार्पणाची प्रक्रिया वेगवान केली आहे. याप्रकरणी भारताने थाई अधिकाऱ्यांना हद्दपारीची विनंती पाठवली होती. तर गोवा सरकारने परराष्ट्र मंत्रालयाकडे त्यांचे पासपोर्ट रद्द करण्याची विनंती देखील केली होती. आगीच्या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी दोघे देश सोडून गेले होते.

### लाभापाई भानामती करताना ३ जणांचा मृत्यू

कोरबा : कोट्यधीश होण्याचा शॉर्टकट म्हणून सुरू झालेला प्रकार थेट मृत्यूचा सापळा बनला. ५ लाख रुपये गुंतवा आणि रातोरात ते अडीच कोटी होतील, असे आमिष दाखवून एका प्रसिद्ध व्यावसायिकासह तीन जणांना काळ्या जादूच्या जाळ्यात ओढण्यात आले. याच गूढ विधीत तिघांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्यातील कुद्री गावात उघडकीस आली आहे. भंगार व्यापारी मोहम्मद अश्रफ मेमन, कोरबा येथील सुरेश साहू आणि बलौदा बाजार येथील नितीश कुमार हे तिघे कुद्री येथील अश्रफ यांच्या फार्महाऊसवर मृतावस्थेत आढळले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तंत्र-मंत्राच्या सहाय्याने पैसे दुप्पट करण्याच्या विधीसाठी बिलासपूरहून एक जादूटोणा करणारा आणि त्याचे चार साथीदार आले होते. फार्महाऊसवरील एका खोलीत हा विधी सुरू असताना तिघांची प्रकृती बिघडली आणि त्यांचा मृत्यू झाला.

# सरकारने खोटे आकडे दाखवून शेतकऱ्यांना फसवले

**अतिवृष्टी प्रस्तावावेळी विरोधकांसह सत्ताधारी सदस्यांनीही सरकारला धरले धारेवर**



नागपूर । प्रतिनिधी

**अतिवृष्टिग्रस्तांना जे पॅकेज दिले आहे, ते नेमके किती शेतकऱ्यांना दिले, असा प्रश्न करत विरोधी सदस्यांसह सत्ताधारी सदस्यांनीही अतिवृष्टिग्रस्तांच्या व्यथा मांडत सरकारवर टीका केली. तीन-चार विभागांचे आकडे एकत्र करून निधीचे आकडे सांगितले जातात. हे आकडे दाखवून राज्य सरकारने शेतकऱ्यांना फसवले आहे, असा आरोप सभागृहात सदस्यांनी केला आहे.**

जर शेतकऱ्यांना मदतच करायची होती तर प्रस्तावाची वाट कशाला बघत होते. बिहारमध्ये प्रत्येकाच्या ▶▶ पान २ वर

### पॅकेजची अंमलबजावणी सभागृहाला सांगा–जाधव

राज्य सरकारने अतिवृष्टिग्रस्तांसाठी दिलेल्या पॅकेजची अंमलबजावणी कशी करणार ते सभागृहाला सांगा, अशी मागणी जाधव यांनी केली. या पॅकेजमधून शेतकरी कसा उभा करणार, दुग्धव्यवसाय कसा उभा राहणार हे सरकारने सांगितले पाहिजे. जाहीर केलेले ३२ हजार कोटी रूपये खरोखर शेतकऱ्यांना देणार का? असा सवालही त्यांनी केला. दरम्यान, वलसाड आंब्याला जीआय नामांकनाची एका मंत्र्याने मखलाशी केल्याचा आरोप करत जाधव यांनी 'एकवेळ तुम्ही गुजरातला जा, पण आमचा हापूस जाऊ देणार नाही, अशी कोपरखळी मारली. ते म्हणाले, आमच्या आंब्यावर घाला का घालत आहात. गुजरातला काही द्यायचे असेल ते द्या. जमले तर तुम्ही जाऊन राहा पण आमचे पेटंट आहे ते आमचेच राहिले पाहिजे.

### ना मंत्री ना अधिकारी उपस्थित...

अतिवृष्टीच्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान केवळ मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील उपस्थित होते. तसेच अधिकारी गॅलरीत कृषी विभागाचा आणि अन्य विभागाचा एकही अधिकारी उपस्थित नव्हता. त्यावरून भास्कर जाधव, अर्जुन खोतकर यांच्यासह सर्वच आमदारांनी प्रश्न उपस्थित केला. मंत्री नाहीत, पण अधिकारीही असू नयेत ही शोकांतिका आहे. शेतकरी अधिवेशनाकडे डोळे लावून बसला आहे. हा सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव असूनही मंत्री उपस्थित नाहीत. कृषी, दुग्ध, पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय मंत्री नाहीत, महसूल मंत्रीही नाहीत. केवळ एक प्रस्ताव मांडला आणि मुलाखती दिल्या म्हणजे पदरात काहीतरी पडते, असे सरकारला वाटत आहे. अधिकाऱ्यांच्या लॉबीत सचिव, उपसचिव अगदी कक्ष अधिकारीही नाही, असे सांगत जाधव यांनी टीका केली.



## राष्ट्रीय महामार्गावर डिझेलच्या टँकरचा स्फोट

बीड । प्रतिनिधी

बीडच्या मांजरसुंबा घाटात मोठी दुर्घटना घडली आहे. मांजरसुंबा घाटात डिझेलच्या टँकर आधी पलटी झाला. त्यानंतर त्याचा स्फोट झाला आहे. या स्फोटानंतर रोडच्या एका बाजूला मोठी आग लागली. या घटनेनंतर तब्बल १०० ते २०० मीटरपर्यंत आग रस्त्यावर पसरली. आगीचे मोठे लोट परिसरात बघायला मिळाले. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. अत्यंत चित्तथरारक अशी ही घटना आहे. या घटनेत कितपत हानी झाली आहे ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण घटनेचा व्हिडीओ पाहता आगीची घटना मोठी असल्याचं जाणवत आहे.

धुळे-सोलापूर महामार्गावर मांजरसुबा घाटात अचानक टँकर पलटी झाला. यानंतर पाठीमागच्या काही गाड्यांची धडक झाल्याची माहिती समोर येत आहे. या दरम्यान अचानक स्फोट झाल्याची माहिती आहे. टँकर पलटी झाल्यानंतर गाडीतील सर्व डिझेल ▶▶ पान २ वर

## माजी केंद्रीय गृहमंत्री, लातूरचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

लातूर । प्रतिनिधी



माजी केंद्रीय गृहमंत्री तथा राजकीय क्षेत्रातील एक सुसंस्कृत, अभ्यासू व्यक्तिमत्त्व लातूरचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता येथील देवघर या त्यांच्या निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने एक अनुभवी, सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न राजकारणी गमावला असून, काँग्रेस पक्षाची अपरिमित ▶▶ पान २ वर

## विदर्भ, मराठवाड्यात थंडीचा कडाका

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील पाच जिल्ह्यांमध्ये आज थंडीची लाट होती. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात थंडीचा कडाका जास्त होता. राज्यातील थंडी कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. राज्यात थंडीची लाट कायम होती. सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, ▶▶ पान २ वर

## बीडः महसूल घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांवर येणार ठपका?

छ. संभाजीनगर। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामधून जाणारा सोलापूर – धुळे राष्ट्रीय महामार्ग आणि अहिल्यानगर – बीड – परळी रेल्वे मार्ग यासाठी शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या मावेजासाठी अनधिकृत लवादाच्या माध्यमातून वाढीव मावेजा मिळवण्यासाठी जवळपास २४१ कोटी ६२ रुपयांच्या भूसंपादन घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या




स्वाक्षरीने झाला. आता ही स्वाक्षरी खरी की खोटी याची तपासणी होईलच मात्र या कोट्यावधीच्या घोटाळ्यामध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक अडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलेल्या चौकशीतून ७३ कोटी रुपयांचा अपहार उघडकीस आला होता. या प्रकरणातील तपास बराच पुढे गेला असला तरी गुन्हा सिद्ध होण्यासाठी अनेक पुरावे गोळा करण्यावर अधिक लक्ष केंद्रीत असल्याचे वरिष्ठ ▶▶ पान २ वर

## स्व.देशमुख प्रकरणात १९ तारखेला दोषारोप निश्चितीची शक्यता

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व निर्घृण हत्या प्रकरणात अभियोग पक्षाकडून विशेष मकोका न्यायालयात सादर करण्यात आलेल्या व्हाईस रेकॉर्डींगच्या पुराव्यावर अभियोग पक्ष आणि आरोपींच्या वकिलांमध्ये एक तास युक्तीवाद झाला. त्यामुळे शुक्रवारी अपेक्षीत असलेली



दोषारोपपत्र निश्चिती आता पुढच्या शुक्रवारी (दि. १९) होणाऱ्या सुनावणीत होण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील दुसऱ्या क्रमांकाचा आरोपी विष्णू चाटे याच्या जामिन अर्जावर सरकारी पक्षाकडून यापूर्वीच युक्तीवाद झालेला आहे. मात्र, त्याच्या वकिलांचा युक्तीवाद बाकी आहे.

९ डिसेंबर २०२४ रोजी संतोष देशमुख यांचे कासारी फाटाजवळून अपहरण करुन त्यांची हत्या करण्यात आली. यासह अवादा कंपनीला खंडणी तसेच याच कंपनीच्या मस्साजोग प्रकल्पावरील भांडण या तीन प्रकरणांचा एकत्रित तपास राज्य गुन्हा अन्वेषण विभागाचे उपमहानिरीक्षक डॉ. बसवराज तेली यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथकाने केला. यात ▶▶ पान २ वर

## विमा क्षेत्रात १०० टक्के विदेशी गुंतवणुकीला मंजुरी!

**मोदी सरकारचा ऐतिहासिक निर्णय; भारतीय विमा बाजारपेठेत नवा अध्याय**

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतीय विमा क्षेत्रासाठी शुक्रवारचा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहावा असा ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने एका महत्त्वपूर्ण प्रस्तावाला मंजुरी देत, या क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीची मर्यादा ७४ टक्क्यांवरून थेट १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीय विमा बाजारपेठेत आता जगभरातील गुंतवणुकीसाठी संपूर्ण दरवाजे उघडले गेले आहेत, ज्यामुळे या क्षेत्राला एक नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने ▶▶ पान २ वर

## वेगळ्या विदर्भाची मागणी पूर्ण होऊ शकत नाही; उद्धव ठाकरेंची ठाम भूमिका

नागपू । प्रतिनिधी

वेगळ्या विदर्भाची मागणी पूर्ण होऊ शकत नाही. विदर्भ हा महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्र हा विदर्भाचा आहे. तो पूर्ण महाराष्ट्राचाच भाग आहे. सध्याचे मुख्यमंत्री हे संपूर्ण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. मात्र ते विदर्भातून येतात, तरी देखील वेगळ्या विदर्भाचा मुद्दा निघत असेल तर आता महाराष्ट्र अखंड ठेवणार की तुकडे होणार हे सरकारने स्पष्ट करावे, अशी स्पष्ट व ठाम भूमिका उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतली. शुक्रवारी त्यांनी ▶▶ पान २ वर

## देशात पहिल्यांदाच होणार डिजीटल जनगणना!

**११ हजार ७१८ कोटी रूपयांचे बजेट मंजूर**

पुणे । प्रतिनिधी

**केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेसाठी तब्बल ११ हजार ७१८ कोटी रूपयांचे बजेट मंजूर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे देशात पहिल्यांदाच डिजीटल जनगणना होणार आहे. यासाठी तब्बल ३० लाख कर्मचाऱ्यांना कामाला लावले जाणार आहे.**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत २०२७ मध्ये देशात जनगणना होणार असल्याचं जाहीर केलं. ही जनगणना दोन टप्प्यात होणार




असल्याचं रेल्वे मंत्री वैष्णव यांनी सांगितलं. पहिल्या टप्प्यात हाऊसिंग लिस्ट आणि हाऊसिंग जनगणना होणार आहे. ही जनगणना २०२६ मध्ये एप्रिल ते डिसेंबर पर्यंत पूर्ण केली जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना होणार आहे. ही लोकसंख्या गणना फेब्रुवारी २०२७ मध्ये होईल. अश्विनी वैष्णव यांनी जनगणनेचं डीजिटल डिझाईन डेटा सुरक्षा लक्षात घेऊन तयार केल्याचं सांगितलं. भारताची जनगणना ही देशातील लोकसंख्या, सेन्सस, सामाजिक आर्थिक स्थिती आणि देशातील संसाधनांचे वितरण याचे एक मोठ्या स्तरावर केलेलं सर्वेक्षण असतं. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अख्त्यारीतील रजिस्ट्रार जनरल आणि सेन्सस कमिश्नर यांच्यद्वारे ही मोहीम संचालित केली जाते. वैष्णव यांनी याचबरोबर भारत ▶▶ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता-पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्किझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
कु.डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) वैद्यकिय अधिकारी, मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते,पाटोदेकर मो.9075387638

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ६८.०० क्विंटल** | | |
| २,४०० | ३,१०० | २,७४७ |
| **ज्वारी/हायब्रिड : ६०.५० क्विंटल** | | |
| २,३५० | ३,३०० | २,८०३ |
| **मका/लोकल: ७.०० क्विंटल** | | |
| १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| **तूर : ३.५० क्विंटल** | | |
| ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| **उडीद :१९.५० क्विंटल** | | |
| ४,५०० | ५,५७३ | ४,९५४ |
| **बाजरी: ४८.०० क्विंटल** | | |
| २,६०० | ५,६०० | ३,१९९ |
| **मुग: २.५० क्विंटल** | | |
| ५,५०० | ७,७०१ | ६,५०० |
| **सोयाबीन: ४८.५० क्विंटल** | | |
| ४,४५० | ४,५०० | ४,४७५ |
| **हरभरा: २.०० क्विंटल** | | |
| ४,००० | ६,८०० | ५,०७० |

cmyk

## अग्रलेख

# शेतकऱ्यांच्या कंठाशी आले तरी यंत्रणा सुस्त

अतिवृष्टी बाधितांसाठी सरकारने जाहीर केलेली अनेक शेतकर्यांची मदत सध्या तरी लालफितीत अडकली आहे. या रकमेचा आकडा तब्बल साडेतीनशे कोटींपेक्षा जास्त आहे. याचे सविस्तर वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. अतिपावसाने झोडपल्यानंतर मुख्यमंत्र्यांसहित अनेक मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधांचे दौरे केले. नुकसानीची पाहणी केली. नुकसान इतके प्रचंड प्रमाणात झाले होते की, मोबाईलवर काढलेली छायाचित्रेदेखील ग्राह्य धरली जातील, असे सरकारने जाहीर केले होते. निकष न लावता, आवश्यकता असेल तर निकष बदलून मदत पोहोचवली जाईल, असे खुद्द मुख्यमंत्र्यांनीच जाहीर केले होते. सरकारने कोट्यवधींचा निधीदेखील जाहीर केला. त्यासाठी पंचनामे होण्याची वाटदेखील पाहिली नाही. त्याचे माध्यमांनी त्यावेळी कौतुकदेखील केले होते. पण सध्या तरी कोट्यवधी रुपये तांत्रिक बाबीत आणि विशेषतः ई-केवायसीत अडकल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. म्हणजेच सत्ताधारी आणि प्रशासकीय पातळीवर एकमत नाही, असा याचा एक अर्थ काढला जाऊ शकेल. राज्याचे प्रमुख कारभारी सांगतात त्याच्या नेमका उलट अनुभव अनेक पीडित शेतकरी सध्या तरी घेत आहेत. मदत जाहीर करणे हे सत्ताधाऱ्यांचे तर ती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे प्रशासकीय यंत्रणेचे काम आहे. अर्थात, यंत्रणेने नियमबाह्य मदत करावी, कोणतेही निकष तपासू नयेत अशी पीडितांचीदेखील अपेक्षा नसेल. यंत्रणा अवाढव्य आहे. तांत्रिक अडचणीदेखील येऊ शकतात, हेही लोक मान्य करतील. तथापि त्या अडचणी दूर करून मदत पोहोचवण्याला प्राधान्य दिले जावे व लोकांच्या तोंडावर अडचणींचे भेंडोळे मारून फेकले जाऊ नये, अशीच लोकांची अपेक्षा असते.

विशेषतः प्रश्न जेव्हा जीवघेण्या नुकसानीचा असतो तेव्हा तरी हा दृष्टिकोन लोकांच्या अनुभवाला यायला हवा. सरकारी कामकाजाचा उद्देश मदत पोहोचवण्याचा असावा, ना की अडचणी सांगण्याचा. ई-केवायसीत नेमक्या काय अडचणी येत आहेत ते संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांना ज्ञात असते. त्यावर मात करण्याचे प्रयत्न तेच अधिक वेगाने करू शकतात. अडचणी सगळेच सांगतात पण त्यावर मात करण्याचे मार्ग स्वयंस्फूर्त पद्धतीने शोधले जाण्याचा अभाव यंत्रणेत ठायीठायी लोकांच्या अनुभवास येतो. तो तसा येऊ द्यायचा नसेल तर हे काम सरकारचे नाही तर आमचे आहे अशी भावना प्रशासकीय यंत्रणेत सार्वत्रिक पातळीवर निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जायला हवेत. प्रशासकीय यंत्रणेला-सरकारी सेवेला मानवी चेहरा अधिक ठसठशीतपणे प्रदान करण्याची खरी गरज आहे. अर्थात, तो नाहीच असे अजिबात नाही. करोना काळात हाच मानवी चेहरा ठसठशीतपणे अनुभवास आला. एरवीही प्रसंगी चौकटीबाहेरचा दृष्टिकोन स्वीकारून जनतेचे भले करणारे अनेक अधिकारी यंत्रणेत काम करतात. ज्यांना जनपसंती लाभते. अशा अधिकाऱ्यांची नियमित बदली झाली तरी ती रद्द करण्यासाठी लोक मोर्चे काढतात. आंदोलने करतात. अशा अधिकाऱ्यांच्या डोक्यावर मात्र बदलीची तलवार नेहमी टांगतीच आढळते. सरकारी सेवेची वर्षे कमी आणि बदल्यांची संख्या त्यापेक्षा जास्त यासाठीच अनेक अधिकारी ओळखले जातात. म्हणजेच सरकारी सेवेत सकारात्मक बदल करण्याची आणि सरकारी सेवांचा चेहरामोहरा बदलण्याची क्षमता यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी राखून असतात.

सरकारी पाठबळ त्यांना प्रेरणा देऊ शकेल. कदाचित त्याचाच मोठ्या प्रमाणावर अभाव असू शकेल का? म्हणूनच मदत अडकली असू शकेल का? मुख्य सचिवांनी आढावा घेतला तेव्हा ही बाब उघड झाली. म्हणजे त्यांनी आढावा घेतला नसता तर ही बाब झाकलेलीच राहिली असती का? तोपर्यंत अडचणींवर मात करण्याचे निदान मार्ग तरी शोधून ठेवावेत, असेही संबंधितांना वाटले नाही. उपरोक्त वृत्ताने असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्यांची उत्तरे शोधणे आणि ती लोकांना देणे हे सत्ताधाऱ्यांचे काम आहे. प्रशासकीय यंत्रणेची मानसिकता कशी बदलेल यावरही चिंतन व्हायला हवे. शेतकऱ्यांचे जीव कंठाशी आलेले असतानाही असे होत असेल तर यातून सरकार काय धडा घेते यावर सरकारी योजनांचे भवितव्य अवलंबून राहील. हे सगळे होत राहील, तूर्तास अडकलेली मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याला प्राधान्य दिले जाईल अशी अपेक्षा.

# साखर संकुल ची इमारत शेतकऱ्यांच्या कष्टा पैशातुन उभी ऊस संकुल नामकरण झाले पाहिजे-रघुनाथ दादा पाटील




**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील साखर संकुलाची इमारत ही शेतकऱ्यांच्या कष्टा च्या पैशाने उभारलेली आहे. त्यावर शेतकऱ्यांचा पहिला हक्क असला पाहिजे. दुर्दैवाने तिथे शेतकऱ्यांना प्रवेश सुध्दा दिला जात नाही. पूर्णपणे इमारतीचा एक मजला शेतकऱ्यांची वजनचोरी आणि रिकव्हरीचोरी करणाऱ्या साखर सम्राटांनी राष्ट्रीय साखर सहकारी कारखाना संघासाठी राखीव केलेला आहे. शेतकऱ्यांना साखर संकुल इमारतीचा फायदा करायचा असेल तर साखर आयुक्तांचे नांव बदलून ऊस आयुक्त करणे गरजेचे आहे. याबाबत शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना कळविले आहे. त्याबाबतचा निर्णय त्यांनी केलेला असेल म्हणून आज १२ डिसेंबर २०२५ रोजी हुतात्मा बाबू गेणू आणि शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून साखर आयुक्तांचे नामकरण ऊस आयुक्त असे आपल्याला करावे लागेल.असा इशारा दिला आहे.ऊस आयुक्तालय करण्यासाठी आयोजित आंदोलना प्रसंगी बोलताना दिला.

साखर आयुक्तांचे नांव बदलून ऊस आयुक्त, नरवीर तानाजी वाडी, शिवाजी नगर,पुणे असे करण्यासाठी शेतकऱ्यांनी १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत पुण्यात पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधून शेतकरी दाखल झाले.. यावेळी भारतीय किसान संघ परिसंघ नवी दिल्ली चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील यांच्या सह क्रांतिसिंह नाना साहेब पाटील शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजी नाना नादखिळे,शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रातील शेकडो शेतकरी उपस्थित होते . यावेळी बोलताना रघुनाथ दादा पाटील म्हणाले की उसाला प्रति टन साडेसात हजार रुपये भाव मिळावा. कारण सन १९६० सालापासून दर दहा वर्षांनी नैसर्गिकरित्या ऊसाचे भाव दुप्पट झाले आहेत. शरद पवारांनी राजू शेट्टी खासदार असताना सन २०१० साली कायद्याचे रुपांतर कायद्यात केले. तेव्हापासून दर दहा वर्षांनी नैसर्गिकरित्या ऊसाचे दर दुप्पट होण्याची नैसर्गिक प्रक्रिया बंद झाली. मागील १५ वर्षापासून ऊसाचे भाव प्रतिटन २५००/- रुपये ते ३५००/- रुपये प्रतिटन एवढेच आहेत. याउलट उत्तर प्रदेशात ऊस मंत्रालय असल्याने ऊसाची सरकार निर्धारित किंमत () प्रतिटन ४५००/ रुपये झाली आह चा कायदा झाल्यापासून सातत्याने रिकव्हरीचा वाद उकरून काढला जातो. चा कायदा ८.५% रिकव्हरीसाठी लागू होता. चा कायदा १०.२५% रिकव्हरीसाठी लागू केला.पावणे दोन टक्के रिकव्हरी वाढविली याचा अर्थ आजच्या भावाने सुमारे ७००/- रुपये प्रतिटन ऊसाचा भाव कमी केला आहे. ऊसाला हाच दर एकरकमी मिळाला पाहिजे. यासाठी राजू शेट्टी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात भांडण्याचे नाटक करीत आहेत.शरद पवार आणि राजू शेट्टी शेतकऱ्यांना नेहमीच मुर्ख समजत आहेत.एक टन ऊसापासून साखर,मळी आणि बगॅस ही प्राथमिक उत्पादन तयार होतात. मळी पासून २७ लिटर रेक्टीफाईड अल्कोहोल तयार होते.त्यापासून १०० लिटर देशी,विदेशी दारू तयार करून विकली जाते.दारु,साखर, बगॅस याची बाजारातील किंमत सुमारे १८ हजार रुपये आहे.एक टन ऊसाच्या विविध उत्पादनावर राज्य आणि केंद्र सरकार सुमारे ४२००/- रुपये कर आकारणी करते.मात्र शेतकऱ्यांना एक टन ऊसाला ५०००/- रुपये मिळू देत नाहीत.एवढा अन्याय शेतकऱ्यांनी का सहन करायचा? याबरोबरच गाई म्हशीच्या दुधाला पेट्रोल आणि डिझेलचा भाव देण्यात यावा तर शेतकऱ्यांच्या पिकाचे होत असते त्या नुकसानीमुळे आणि शेतकऱ्यांच्या जीवित हानीमुळे वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा रद्द करावा अशी मागणी रघुनाथ दादा पाटील यांनी केली आहे.

# गोपीनाथगडाची निर्मिती वंचित, उपेक्षितांसाठीच; त्यांच्याच आदर्शावर माझी वाटचाल-ना.पंकजा मुंडे

**परळी वै । प्रतिनिधी**

**गोपीनाथगडाची उभारणी हीच मुळात लोकनेते मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला नतमस्तक होता यावे, त्यांचे सुख-दु:ख त्याला मस्तक टेकून सांगता यावे यासाठी केलेली आहे. पृथ्वीतलावरील एकमेव असा हा गड आहे जो एका लेकीने आपल्या वडीलांच्या स्मृतीनिमित्त उभा केला आहे. वास्तविक पाहता हा गड मी उभा केलेला नाही तर ईश्वरानेच हे घडवून आणलेले आहे. मुंडे साहेबांनी आयुष्यातला क्षण न् ? क्षण वंचित, पिडीतांसाठी वेचला आहे, त्यांच्याच आदर्शावर माझी वाटचाल आहे अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.**



लोकनेते मुंडे साहेब यांची जयंती आज गोपीनाथ गडावर विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली, त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. प्रारंभी सकाळी ना.पंकजाताई मुंडे, मातोश्री प्रज्ञाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, आ.धनंजय मुंडे व मुंडे परिवाराने लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी पुढे बोलताना ना.पंकजाताई म्हणाल्या, मुंडे साहेबांच्या जीवनाचा प्रवास वंचित, पिडीतांसाठी होता. प्रत्येकवेळी स्वत:पेक्षाही जास्त विचार त्यांनी लोकांचा केलेला आहे. स्वत:च्या जिवापलीकडे जावुन इतरांचा विचार करणारा हा अव्दितीय लोकनेता व माझा पिता आहे. मुंडे साहेबांचा एकदा अपघात झाला होता तो फार भयंकर होता त्यावेळी एक लहान मुलगा रस्ता पार करत असताना त्याला वाचविण्यासाठी चालकाने गाडी अचानक वळवली, तो मुलगा बचावला पण मुंडे साहेबांनाच खुप मोठी हानी झाली, रुग्णालयात दाखल केले गेले. मुंडे साहेब शुध्दीवर आल्यानंतर पहिला प्रश्न त्यांनी विचारला तो मुलगा कसा आहे? त्याला काही लागलयं का? त्याचा पुर्ण इलाज करा, त्याला तर खरचटलं पण नव्हतं. परंतु अशा स्वत:च्या जिवावर बेतलेल्या वेळीही मुंडे साहेबांना काळजी लोकांची होती. स्वत:च्याही पलिकडे जावुन त्यांनी लोकांचा विचार नेहमीच केला. मी मुंडे साहेबांच्या समाधीच्या चरणी हीच प्रार्थना केली की त्यांनी जे-जे उभा केले ते मोठे करण्याची आमची क्षमता असो अथवा नसो पण त्याला सदृढ ठेवणं आणि ती परंपरा कायम ठेवणं हेच आशीर्वाद आम्हाला द्या.

# पोलीस महानिरिक्षक वीरेंद्र मिश्र यांच्या हस्ते १६० संगणक संच वाटप

**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, पोलीस महानिरीक्षक श्री वीरेंद्र मिश्र हे आज जालना येथे आले असता त्यांनी पोलीस प्रशासनामध्ये विविध विषयावर बैठकीचे आयोजन केले होते.

१२.१२.२०२५ रोजी मा.श्री. वीरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांनी जालना जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रमुख यांची पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे गुन्हे आढावा परिषद घेतली. सर्वप्रथम सदर परिषदेमध्ये मा.श्री. वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते जिल्हा नियोजन समिती येथुन मिळालेल्या एक कोटी सत्तावन लाखाचा या अनुदानातुन ३० झेरॉक्स मशिन, ६० संगणक संच, ६० प्रिंटर व १० लॅपटॉपचे जालना जिल्हयातील पोलीस ठाणे व उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालय तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय येथील शाखेस वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक अजय



कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचीही उपस्थिती होती. त्यांनतर माहे ११/२०२५ मध्ये उल्लेखनिय कामगीरी करणाऱ्या पोलीस अधिकारी /अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर गुन्हे परिषदेमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, मोटारसायकल चोरी, चारचाकी चोरी व इतर प्रलंबित गुन्हयांचा आढावा घेऊन सदरील गुन्हे लवकरात लवकर निकाली काढण्यासंदर्भाने महत्वाच्या सुचना दिल्या. तसेच सर्व प्रभारी अधिकारी यांनी पुढील काळात अमली पदार्थाबाबत जास्तीत जास्त दर्जेदार कारवाया करण्याच्या सुचना दिल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी व प्रभारी अधिकारी यांनी जास्तीत जास्त गावभेटी द्याव्यात व प्रत्येक गावात सिसिटीव्ही कॅमेरा लावणे बाबत जनजागृती करावी व नविन कायद्याची अंमलबजावणी करुन दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणेबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना शरीराविरुध्द व मालाविरुध्द च्या गुन्हयातील दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या आरोपीतांवर प्रतिबंधक कारवाई करण्याच्या व अवैध धंद्याच्या दर्जेदार कारवाया करण्याच्या सुचना केल्या आहेत. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गुन्हे आढावा परिषदेमध्ये मा. अजयकुमार बंसल पोलीस अधीक्षक जालना, मा. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व सर्व शाखा प्रमुख हे पोलीस अधीक्षक कार्यालय येथे हजर होते.

## पान १ वरून...

### सरकारने खोटे आकडे दाखवून

खात्यात १० हजार रुपये देताना कोणता प्रस्ताव होता, अशी विचारणा या वेळी करण्यात आली. शिवसेनेचे भास्कर जाधव म्हणाले, राज्य सरकारने अर्थसंकल्पाखेरीज १ लाख ८४ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या वर्षभरात मांडल्या आहेत. आताच्या ७५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आहेत. या पुरवणी मागण्यांत शेतकऱ्यांना काही नाही. तीन-चार विभागांमार्फत वेगवेगळ्या दिलेल्या निधीचे आकडे सांगितले जातात. त्यामुळे हे आकडे फसवे असतात. केंद्रीय कृषिमंत्र्यांनी संसदेत सांगितले, की मदतीसाठी राज्य सरकारने कोणताही प्रस्ताव पाठवला नाही. तरीही राज्य सरकार प्रस्तावाच्या तारखा देत आहे. तुम्ही केवळ सभागृहाला फसवत नाही तर शेतकऱ्यांनाही फसवता आहात. बिहारला प्रत्येकाच्या खात्यात १० हजार रुपये कुणी मागितले होते? तेथे कोणता पूर होता? तरीही निधी दिला ना? नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पाहणी पथक रातोरात येऊन गेले. शेतकरी आशेने बसला असताना त्याला सरकारने फसवण्याचे काम केले आहे, असे ते म्हणाले. भाजपचे रणधीर सावरकर म्हणाले, सोयाबीनचे हजार रुपये क्विंटलमागे नुकसान आहे, एकरी १० ते १२ क्विंटल कापूस विकत घेतला नाही तर शेतकरी नागवला जाणार आहे. मी राज्य सरकारकडे ९८६ कृषी पदे वळती करण्याचे पत्र दिले होते. मात्र, त्याचे पुढे काहीच झाले नाही. ते पुढे म्हणाले की, कृषी विद्यापीठे नफा कमावण्याचे मशिन नाही, ती भावी पिढ्यांची गुंतवणूक केंद्र आहे. कृषी शिक्षण व संशोधन परिषद ही राजकीय पुनर्वसनाची जागा झाली आहे. तेथे १० जण बसतात आणि विद्यापीठांना कंट्रोल करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक विद्यापीठाची पीक पद्धत, जमीन वेगळी आहे. राजकीय पुनर्वसनासाठी तेथे पदाधिकारी नेमले जातात. आयएएस ऑफिसर शिक्षा म्हणून तेथे पाठवला जातो. अशा संस्थेची गरज नाही. त्यामुळे ही परिषद बरखास्त करून टाका. अब्दुल सत्तार यांनी पीक विम्यावरून प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, पीक विम्याबाबात ५० टक्के आत आणेवारी आली तर नुकसान भरपाई देताना पीकविमा द्यायलाच हवा. पण जिल्हाधिकाऱ्यांचेही विमा कंपन्या ऐकत नाहीत. १२ वी पास विमा प्रतिनिधी मूल्यांकन ठरवतो. पीकविमा प्रतिनिधी चिरीमिरी घेऊन विमा देतो. या विरोधात कायद्याने कठोर पावले उचलावीत.

--------

### राष्ट्रीय महामार्गावर

रस्त्यावर पडलं. त्यानंतर मोठा स्फोट झाला आणि संपूर्ण रस्त्यावर आग भडकली. दरम्यान, या काळात स्थानिक नागरिकांनी टँकरच्या चालक आणि क्लिनरला सुखरुप बाहेर काढलं. त्यामुळे ते सुदैवाने बचावले आहेत.आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त टँकर हा मांजरसुंबा घाटातून जात असताना घाटातील अवघड वळणावर चालकाचा गाडीवरील नियंत्रण सुटलं. त्यामुळे हा टँकर पलटी झाला. घाटाचा रस्ता असल्यामुळे हा डिझेलने भरलेला टँकर पलटी झाल्यानंतर काही अंतरापर्यंत घसरत गेला. यामुळे गाडीतील डिझेल रस्त्यावर पडले. या दरम्यान मोठा स्फोट झाला. या स्फोटनंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात डिझेल सांडल्यामुळे आगीचा मोठा भडका उडाला. ही आग १०० ते २०० मीटरपर्यंत पसरली. घटनेनंतर रस्त्यावर आगीचे मोठे लोट बघायला मिळाले.

--------------

### विदर्भ, मराठवाड्यात

जळगाव आणि यवतमाळ जिल्ह्यात थंडीची लाट होती. मध्य महाराष्ट्रात थंडीचा कडाका अधिक होता. जेऊर येथे राज्यातील सर्वात कमी ५ अंशाची नोंद झाली होती. तर धुळे आणि निफाड येथील गहू संशोधन केंद्रात ६.१ अंश सेल्सिअसची नोंद झाली होती. जळगाव येथे ६.९ अंश तर अहिल्यानगर येथे ७.३ अंश सेल्सिअस तापमान होते. मालेगाव, नाशिक, सातारा, गोंदीया, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यात किमान तापमान १० अंशाच्याही खाली होते.

-------------

### माजी केंद्रीय गृहमंत्री, लातूरचे सुपुत्र

हानी झाली आहे. लातूर जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक जडणघडणीत माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे मोलाचे योगदान आहे. लातूरचे नगराध्यक्ष ते केंद्रीय मंत्रिपदापर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास खरोखरच वाखानण्याजोगा आणि आदर्शवादी राहिलेला आहे. केंद्रीय राजकारणात ३ दशकांपेक्षा अधिक काळ त्यांनी लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. त्यांची संपूर्ण कारकीर्द लातूर जिल्ह्याला देशपातळीवर सन्मान मिळवून देणारी होती. इतका प्रदीर्घ काळ राजकारणाच्या केंद्रस्थानी राहूनही अजातशत्रू, सुसंस्कृत राजकारणी म्हणून त्यांची कायम ओखळ राहिलेली आहे. त्यांच्या निधनामुळे देशाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले आहे.

---------------

### स्व.देशमुख प्रकरणात १९ तारखेला

वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, महेश केदार, जयराम चाटे, प्रतिक घुले, सुधीर सांगळे व कृष्णा आंधळे यांच्यावर आरोप ठेवण्यात आले. या प्रकरणाची सुनावणी येथील विशेष मकोका न्यायाधीश व्यंकटेश पटवदकर यांच्या न्यायालयात सुरु आहे. खुनाच्या घटनेला वर्षे लोटून गेले तरी अद्याप आरोपींवर दोषारोपपत्र निश्चित झालेले नाहीत. दरम्यान, मागच्या सुनावणीत (ता. २७ नोव्हेंबर) विशेष मकोका न्यायालयात या प्रकरणातील दुसऱ्या क्रमांकाचा आरोपी विष्णु चाटे याच्या जामिन अर्जावर सरकारी पक्षाकडून युक्तीवाद करण्यात आला. घटनेतील फरार आरोपी कृष्णा आंधळे सापडत नसल्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देखील तपास यंत्रणांना विशेष मकोका न्यायालयाने दिल्या होत्या.

------------

### बीडः महसूल घोटाळ्यात तत्कालीन

पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. या गैरप्रकारात परळी येथील सहाय्यक महसूल अधिकारी संजय हांगे, संगणक परिचालक अविनाश चव्हाण, शेख अजहर शेख बाबू व बीड येथील सेवानिवृत्त कर्मचारी विनोद पिंगळे, सहाय्यक महसूल अधिकारी पांडुरंग पाटील, ॲड. एस. एम. ननवरे, ॲड. नरवडकर, ॲड. पिसुरे, ॲड. प्रवीण राऊत आदींचा सहभाग असू शकतो, असे प्राथमिक चौकशीतून स्पष्ट झाले होते. बनावट आदेश तयार करण्याच्या गैरप्रकारात प्रमुख अधिकारी, कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर घोटाळा समोर आला होता. जुन्या तारखांचे ४० लवाद आदेश आढळून आले होते. तत्कालीन जिल्हाधिकरी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून दि. १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंतच्या १५४ बनावट आदेश निर्गमित करण्यात आले होते. यातील सर्व कागदपत्रे आणि संचिका पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून, या प्रकरणाचा खरा सूत्रधार कोण, हे तपासण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. या प्रकरणात घडलेल्या गुन्ह्याचा तपास केल्यानंतर तो कागदोपत्री सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे गोळा केले जात असल्याचे सांगण्यात आले. बनावट सह्या, दूरध्वनीवरील संभाषणासह सर्व पुरावे गोळा करुन कारवाईची दिशा ठरवली जाईल, असे पोलिसांनी सांगितले. या सर्व प्रकरणात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची स्वाक्षरी खरी की खोटी हे तपासण्यासाठी हॅन्ड रायटिंग एक्सपर्ट यांच्याकडे देखील पाठवले जाणार आहे. त्यानंतर आरोप निश्चिती केली जाणार असली तरी या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी आणि काही अधिकारी व कर्मचारी अडकण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

-----------

### वेगळ्या विदर्भाची मागणी पूर्ण होऊ

विधानभवन परिसरात माध्यमांशी संवाद साधला. सध्या सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात वेगळ्या विदर्भाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वेगळ्या विदर्भाचा मुद्दा आमच्या अजेंड्यावर असल्याचे म्हटले आहे. अशात उद्धव ठाकरे यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी पूर्ण होऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. यावरुन त्यांनी सत्ताधारी भाजपवर पुन्हा एकदा निशाना साधला. नागपुरात हिवाळी अधिवेशन होत असूनही अद्याप विदर्भाच्या वाट्याला काहीही आलेले नाही. हिवाळी अधिवेशन हे नागपूर आणि विदर्भाचे प्रश्न सोडवण्यासाठी आहे. प्रत्यक्षात तसे काहीच झालेले नाही. याउलट, आगामी महापालिकेच्या निवडणुका डोळ्यापुढे ठेवून मुंबईसह इतर महापालिकांसाठी निधीची घोषणा करण्यात येत आहे. त्यामुळे या अधिवेशनातून नागपूर-विदर्भाला काय दिले? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांचे दोन सहकारी असलेल्या नगरविकास आणि अर्थमंत्री यांनी द्यावे, असे आवाहन देखील ठाकरेंनी केले. दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नसल्यामुळे उद्धव ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर तसेच विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांची भेट घेतली. या भेटीसंदर्भात बोलताना ते म्हणाले,आम्ही दोन्ही सभापतींना विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्याची विनंती केली आहे. त्यांनी देखील लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. जर, संख्याबळ वा कुठल्या नियमाची आडकाठी येत असेल तर असंवैधानिक असलेले उपमुख्यमंत्रिपददेखील रद्द करायला हवे, अशी आमची मागणी असल्याचा पुनरुच्चार ठाकरे यांनी केला.

-----------

### विमा क्षेत्रात १०० टक्के

विमा (दुरुस्ती) विधेयक मंजूर केले आहे. सरकारने हे विधेयक आता संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात मंजुरीसाठी सादर करण्याची योजना आखली आहे. या कॅपला पूर्णपणे हटवण्यामागे सरकारचा एकच उद्देश आहे तो म्हणजे, विमा क्षेत्रासाठी दीर्घकालीन विदेशी भांडवलाचा प्रवाह सुरळीत करणे. या महत्त्वपूर्ण बदलामुळे फायदे अपेक्षित आहेत. यामुळे बॅलन्स शीट मजबूत होणार आहे. भारतीय विमा कंपन्यांना त्यांची आर्थिक ताकद वाढवण्यास मदत मिळेल. कंपन्यांची दायित्वे पूर्ण करण्याची क्षमता सुधारेल. देशातील अधिकाधिक नागरिकांना विमा कवच उपलब्ध होईल. पूर्ण विदेशी मालकीमुळे या क्षेत्रात स्पर्धा वाढेल, ज्यामुळे उत्पादनांमध्ये नावीन्यता येईल आणि अंतिम पॉलिसीधारकांसाठी विम्याचा खर्च कमी होण्याची शक्यता आहे.

---------

### देशात पहिल्यांदाच होणार

कोळसा उत्पादनात स्वयंमपूर्णतेकडे वाटचाल करत आहे असं सांगितलं. २०२४ -२५ मध्ये भारताने ऐतिहासिक एक अब्ज टन पेक्षा जास्त कोळसा उत्पादन केलं आहे. यापूर्वी कोळसा आयात करण्यावर आपला जास्त भर होता. आता कोळशाची आयात खूप कमी करण्यात आपल्याला यश आलं आहे. यामुळे आपले ६० हजार कोटी रूपये वाचल्याचे देखील वैष्वण यांनी सांगितले.

-------------

# चाकूरकर यांच्या जाण्याने राजकारणातील ऋषीतुल्य व सात्विक नेता हरवला-पंकजा मुंडे

लातूर । प्रतिनिधी

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या जाण्याने राजकारणातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व व राजकारणातील एक सात्विक नेता हरवला अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत.

मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चाकूरकर कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्याचबरोबर शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या निधनाबद्दल शोक संवेदना व्यक्त करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, राजकारणातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व व राजकारणातील एक सात्विक नेता आज हरवला आहे.शिवराज पाटील चाकूरकर हे आपल्या जीवनामध्ये सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले. देश पातळीपर्यंत अत्यंत सन्मानाने आणि स्वाभिमानाने सात्विक असं राजकारण त्यांनी केलं. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याची शक्ती ईश्वर देवो अशा शब्दात ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५


## थोडक्यात



**माजलगाव :– तालुक्यातील देपेगाव येथील युवक शिवराज जयराम राऊत यांची इंडियन आर्मीमध्ये निवड झाल्याबद्दल ह.भ.प. विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे यांनी सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

## सांची बुद्ध विहार येथे सुर्यपुत्रास जयंती दिनी अभिवादन



**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतिन भारतीय बौद्ध महासभेचे दुसरे राष्ट्रीय अध्यक्ष,चैत्यभूमीचे शिल्पकार ,सुर्यपुत्र यशवंत उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंती दिनी सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेच्या महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे या होत्या तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, जिल्हा संघटक बी सी डोंगरे,माजी जिल्हा उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,शिवाजी मोरे,भारतीय बौद्ध महासभेचे तालुका कोषाध्यक्ष डी एस साळवे ,तालुका संस्कार उपाध्यक्ष गुलाबराव धाईजे,कलावतीताई मोरे,भगवान डोंगरे,मोहन काकडे,संभाजी धाईजे हे उपस्तीत होते तसेच या कार्यक्रमाच सुत्रसंचलन महिला तालुका सरचिटणीस कोमलताई डोंगरे,यांनी केले तर आभार महिला तालुका कोषाध्यक्षा अनुराधा साळवे यांनी मानले



## लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची वडवणी शहरात जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

दिनांक. १२ /१२/२०२५ शुक्रवार रोजी वडवणी शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकात लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती सर्वप्रथम वडवणी नगरीचे उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे यांनी . गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्याचबरोबर तालुक्यातील व परिसरातील अनेकांनी यावेळी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. व झेंडा वंदन करून जयंती साजरी करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थितीत रविंद्र मुंडे, योगेंद्र मुंडे , दिलीप तात्या मुंडे, नगरसेवक अरुण मुंडे, महादेव दादा उजगरे, पत्रकार शंकरराव झाडे,बालासाहेब चाटे, सर्जेराव तंटे, डॉ सतिश मुंडे, विकास मुंडे, विष्णू आंधळे,राजे भाऊ टकले, महादेव मुंडे, चोले भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त ४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

केज । प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी एकूण ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीवरील आपले प्रेम व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ या संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय केज श्रीकृष्ण नागरगोजे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, मा. वि. चे मु. अ. शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंत शितोळे, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. गणेश कोकीळ, प्राचार्य शंकर भैरट, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे आदी उपस्थित होते.



सदरील रक्तदान शिबिर हे मागील ३० वर्षापासून या शाळेमध्ये आयोजित केले जाते. यावर्षी सदरील शिबिराने ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मागील ७ वर्षापासून हे शासकीय शिबिर सुरू आहे. या शिबिराचा सर्वसामान्य याचकाला उपयोग होतो. रक्तदानाबद्दल रक्तदात्यामध्ये बरेच गैरसमज असतात परंतु रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, वयाच्या १८ ते ५५ वर्षापर्यंत आपण रक्तदान करू शकतो, रक्तदान केल्याने बरेच आजार कमी होतात, रोगप्रतिकारशक्ती वाढते, वजन कमी होते तसेच ७२ तासांमध्ये दिलेले रक्त पुन्हा परत येते. दर ६ महिन्याला रक्तदान केले पाहिजे जेणेकरून याचकाचे प्राण वाचतील.

याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. अशोक डोईफोडे, सहशिक्षक महादेव गिरी तसेच कैलास अंधारे हे या शिबिराचे पहिले रक्तदाते ठरले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच सतीश गायकवाड लॅब असिस्टंट, विनोद रावताडे लॅब टेक्निशियन तर युवराज बाबरे, हेमंत बेलदार, वैभव टाकळे यांनी ब्रदर्स म्हणून विशेष परिश्रम घेतले.

तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून युवा मास्टर स्ट्रोक कॉम्पिटिशन च्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा परीक्षेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. यामध्ये– सातवी ते दहावी गटातून कु. वेदिका सिद्धेश्वर घुले ७ वी, अनुष्का बाळासाहेब अहंकारे ७ वी, यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वरील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील चित्रकला शिक्षक दादासाहेब गायकवाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.

## कृषीमुल्य आयोग व आमदार, खासदारांचा निषेध करत भाई थावरेंच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी केली तेलगावात कापसाची प्रतिकात्मक होळी

दिंद्रुड। प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापुस, सोयाबीनसह इतर शेतीमालाला योग्य भाव मिळत नसुन,गेल्या कांही वर्षापासुन शेतीमालाच्या भावात वाढच झालेली नाही.तसेच यासाठी कृषीमुल्य आयोग अथवा आमदार खासदार यांनी कधी आवाज ही उठवत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळेच कृषीमुल्य आयोग व आमदार खासदार यांचा तीव्र निषेध व्यक्त शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली गुरूवारी तेलगाव येथे शेतकऱ्यांनी कापसाची प्रतिकात्मक होळी करून निषेध व्यक्त केला.यावेळी कृषीमुल्य आयोगाच्या विरोधात घोषणाही दिल्या.



शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापुस, सोयाबीनसह इतर शेतीमालाला योग्य व रास्त भाव मिळत नाही.विशेष म्हणजे गेल्या कांही वर्षापासुन शेतीमालाच्या भावात वाढच झाली नाही.शेतीमालास भाव किती व कसा भाव द्यायचा यासाठी स्वतंत्र कृषीमुल्य आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. मात्र हा कृषीमुल्य आयोग शेतकरी हिताचा निर्णय न घेता सरकार हिताचाच निर्णय घेत असल्याचे दिसून येते.त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटांचा मुकाबला करावा लागतो.शेतीमालास योग्य भाव मिळत नसल्याच्या निषेधार्थ व कृषीमुल्य आयोग व आमदार खासदार यांचा निषेध व्यक्त करण्यासाठी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी कापसाची प्रतिकात्मक होळी आंदोलन करण्याचा निर्णय घेत गुरूवार दि.११ डिसेंबर रोजी धारूर तालुक्यातील तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेतकऱ्यांच्या उपस्थितीत कापसाची प्रतिकात्मक होळी करून व सोयाबीन रस्त्यावर टाकून तसेच कृषीमुल्य आयोग भावात वाढीसाठी सरकारकडे शिफारस करत तसेच शेतीमालाच्या भाववाढीसाठी आमदार, खासदार सभागृहात कधीच साधा आवाज ही उठवत नाहीत. त्यामुळे त्यांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत त्यांच्या विरोधात घोषणा दिल्या.यावेळी भाई थावरे यांनी आपल्या भाषणात कृषीमुल्य आयोग आपले करारास पार पाडत नसुन, हा आयोग शेतकऱ्यांसाठी आहे. या कृषीमुल्य आयोगाच्या अधिकाऱ्यांना विसर पडल्याचा आरोप भाई गंगाभिषण थावरे यांनी शेतकऱ्यांच्या कापसासह सोयाबीन व इतर शेतीमालास जो पर्यंत भाववाढ दिली जात नाही,तोपर्यंत आमचे आंदोलन चालुच राहील.असा इशाराही भाई थावरे यांनी यावेळी दिला.या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

## पान ६ वरुन...

### मनोविकृत मनोज चौधरी

पान ६ वरुन...

शिवीगाळ आणि उत्तेजक भाष्य करत आहे. यामागे त्याचा उद्देश समर्थकांना भडकवून अघटीत घडवून आणण्याचा असल्याचेही निवेदनात नमूद आहे. सतत जनतेसाठी काम करणारे अशी आ.सुरेश धस यांची प्रतिमा आहे. मात्र गेल्या काही दिवसापासून मनोज चौधरी व इतर काही लोक यांनी फेसबुक व इतर समाज माध्यमावर आमदार सुरेश धस यांची मानहानी होईल बदनामी होईल अशा पद्धतीने मजकूर प्रसाद करून त्यांची प्रतिमा मलिंग करण्याचा प्रयत्न करत आहेत मनोज चौधरी अत्यंत मन विकृत पद्धतीने हे काम करत असून आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानासमोर जाऊन आणि समर्थकांसमोर जाऊन त्यांना राग येईल असा पद्धतीने अत्यंत खालच्या पातळीवरील अर्वाचे भाषेमध्ये शिवीगाळ व बेताल व्यक्तव्य करत आहेत असे या निवेदनात नमूद आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बीड येथील कार्यक्रमादरम्यान देखील या व्यक्तीने आमदार धस यांच्या विरोधात जाहीररित्या गैरवर्तन केले व वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न केला. अशा गंभीर प्रकाराची दखल आजवर पोलीस प्रशासनाने घेतली नसल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

धस समर्थकांनी संयम पाळला असला तरी सातत्याने होत असलेल्या या मनोविकृत वर्तनामुळे समाजात तणाव निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करून मनोचौधरीवर तात्काळ दखलपात्र गुन्हा नोंदवून कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस पोलीस प्रशासन जबाबदार राहील असेही नमूद केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या बीड येथील सभेमध्ये मनोज चौधरी यांनी केलेल्या गैरकृत्याची पोलीस विभागाने दखल घेतली आहे. आपल्या सर्वांच्या भावना आम्ही लक्षात घेतल्या आहेत. मनोज चौधरी व इतर कोणी आक्षेपार्ह विधान करून पोष्ट करत ११असतील तर यांच्या विरुद्ध लवकरच कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

नवनीत कावत, जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड

### राज्यस्तरीय बैठकीला

या कार्यक्रमास अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, उपमुख्यमंत्र्यांचे आरोग्य कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, पत्रकार विशाल परदेशी, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे आदींसह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ ते १ पर्यंत पुरस्कार वितरण सोहळा आणि दुपारी २ वाजता परिषदेची बैठक होणार आहे. या सोहळ्यास बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

### मल्टिस्टेटच्या प्रॉपर्टी

मल्टिस्टेटसह सर्व आरोपींच्या प्रॉपर्टीचा लिलाव जाहिर करावा, ज्ञानराधासह इतर मल्टिस्टेटचे फॉरेन्सीक ऑडिट करा, आशिष पाटोदेकर व त्यांच्या नातेवाईकांच्या नावावरील प्रापॅर्टी जप्त कारव्यात अशी मागणी करण्यात आली. लिलाव प्रक्रियेला गती मिळाली नाही, तर सोलापूरधुळे महामार्ग ठप्प करण्याचा इशारा ठेवीदारांनी दिला. मंत्री नितेश राणे, आमदार सुरेश धस, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर व नारायण कुचे यांनी ठेवीदारांची बाजू शासन दरबारी ठामपणे मांडल्याली यावेळी जिल्हाभरातून ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले.

**व्याज नको, मुद्दल द्या : ठेवीदारांची मागणी**

राष्ट्रीयीकृत बँकांच्या कमी व्याजदरामुळे नागरिक मल्टिस्टेटकडे वळतात. त्यामुळे भविष्यात अशी परिस्थिती टाळायची असेल तर राष्ट्रीयीकृत बँकांनी आकर्षक व्याजदर द्यावेत, अशी मागणी आंदोलनात ठेवीदारांनी केली. बुडीत मल्टिस्टेटची प्रॉपर्टी जप्त करून ठेवीदारांना किमान मुद्दल रक्कम परत मिळावे, व्याजाची अपेक्षा नाही अशी भावना ठेवीदारांनी व्यक्त केली.

### केंद्राचे पथक प्रत्यक्ष

दलाली करणाऱ्यांचे धाबे दणाणलेआहे.

केंद्र शासनाच्या वतीने बीड जिल्ह्यामध्ये जवळपास सर्वच गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली. प्रत्येक व्यक्तीला ५४ लिटर पाणी मिळावे यासाठी या योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली. यासाठी कोट्यावधी रुपयांचे बजेट देण्यात आले. या योजनेचे एस्टिमेट तयार करताना अर्धा किलोमीटर वर पाणी असतांना चार –चार किलोमीटरचे एस्टिमेट तयार करण्यात आले. आणि याबद्दल कोट्यावधी रुपये लाटण्याचा कार्यक्रम तयार करण्यात आला. अनेक पुढाऱ्यांनी आपापल्या योजना चे एस्टिमेट वाढवून घेतले. प्रत्यक्षात मात्र या योजना अजूनही अर्धवटच आहेत. गेल्या दोन वर्षापासून केवळ शंभरच्या पुढे आकडा जात नाही. त्यामुळे बीड जिल्हा हा केंद्र शासनाच्या रडारवर आल्याने शासनाने प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी एक पथक पाठवले. अद्यापही १०० योजना ही पूर्ण नसताना आकडे फुगवून दाखवण्यात आले. त्यामुळे आता प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी पथक आल्याने अधिकाऱ्याच्या बुडाला आग लागली असून आता प्रत्यक्षात दाखवायचे कसे? योजना पूर्ण नसल्याने अडचणीत येणार म्हणून समितीला बदनाम करण्याचा डाव या अधिकाऱ्यांनी रचला. या समितीने वस्तुनिष्ठ अहवाल दिला तर अनेकांना घरी जाण्याची वेळ येईल अशी सध्या स्थिती आहे. जल जीवन मिशनच्या योजना पूर्ण झाल्यानंतर त्या कायमस्वरूपी कशा हाताळायच्या यासाठी राजस्थानच्या एका संस्थेला प्रशिक्षणाचे काम देण्यात आले. हे प्रशिक्षण कुठे घेतले, कुठे घेतलेच नाही अशा स्थितीत आणि थातूरमातूर उपस्थिती असतानाही शंभर टक्के उपस्थित दर्शवून अहवाल तयार करून कोट्यावधी रुपये लुटले. यासाठी काम करणारे दलालही या समितीमुळे अडचणीत येणार असून या प्रशिक्षण घेणाऱ्या संस्थेच्या व्यवस्थापकाने बीडमधून पळ काढल्याचे बोलले जात आहे. या समितीमुळे अधिकाऱ्यांनी जो गोंधळ घातला आणि बीले देण्यासाठी ही योजना पूर्ण झाल्यानंतरही आडवणूक केली. त्याचा पाढा आता लोक वाचत असून समिती गावात गेल्यानंतर लोक सत्त्य परिस्थिती सांगतील या भीतीने या प्रकरणात अडकलेले अधिकारी आणि कर्मचारी यांचे धाबे दणाणले आहे.प्रत्यक्षात योजना पूर्ण नसताना केवळ कागदपत्री आकडे फुगवून योजना पूर्ण झाल्याचे दर्शवून केंद्राच्या पाणीपुरवठा विभागाची दिशाभूल करण्याचे काम आतापर्यंत चालू होते. मात्र आता प्रत्यक्ष समिती आल्याने आता हे सर्वच पितळ उघडे पडणार. या भीतीने आता अधिकाऱ्यांनी समितीला बदनाम करण्याचा डाव रचला आहे.

### आमदार साहेब; उघडा

धोका निर्माण झाला आहे. अनेक छोट्या–मोठ्या अपघातांचे प्रकार घडूनही प्रशासनाने दखल न घेतल्याची नाराजी ग्रामस्थ व्यक्त करतात. ग्रामस्थ, सामाजिक संघटना आणि युवकांनी एकमुखी मागणी केली आहे की दादांनी या रस्त्यात लक्ष घालून रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी व आमची किटकिट दूर करावी. आमदार साहेबानी सदरील परिस्थितीची तातडीने पाहणी करून निधी उपलब्ध करून दिल्यासच नागरिकांचा संताप शांत होईल. अन्यथा येणाऱ्या जिल्हापरिषद – पंचायत समिती निवडणुकीत आम्ही मतदान करणार नाही असा इशारा दिला आहे आणि त्यातून प्रशासनास जागे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय

माजलगाव । प्रतिनिधी

टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशन यांच्यावतीने अक्कलकोट येथे घेण्यात आलेल्या २७ व्या मिनी व युथ राज्यस्तरीय टेनिसव्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा टेनिस व्हॉलीबॉलचा संघ युथ गटामधून राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये द्वितीय आला आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघामध्ये कर्णधार वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, प्रियंका जाधव, गौरी गायकवाड या विद्यार्थिनींचा समावेश होता. या खेळाडूंचा पहिला सामना अहमदनगर जिल्हा सोबत होऊन सरळ दोन सेट मध्ये विजय मिळवला,दुसरा सामना लातूर जिल्ह्याशी झाला , लातूरच्या संघास सहज पराभूत करून,फायनलचा अंतिम सामना सांगली विरुद्ध बीड असा झाला,अंतिम सामन्यांमध्ये अटीतटीच्या लढतीमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. या संघामधील उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्यामुळे, २४ ते २७ डिसेंबर झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी वैष्णवी कोरडे,अदिबा शेख, यांची निवड झाली आहे,सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या या दोन खेळाडू झारखंड येथे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.




विजेत्या खेळाडूंना प्रा.प्रविण कोरडे, प्रा.नवनाथ आवारे, प्रा.चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे,उप प्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे,पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे,प्रा.टाक सर.प्रबंधक प्रशांत चव्हाण,प्रा.सुदर्शन स्वामी,प्रा.आय. एस.पठाण, एकनाथ मस्के,बनसोडे सर, गोकुळ शिंदे,बेदरे आदींनी अभिनंदन केले .

## तुमच्या आमच्या मनात आजही मुंडे साहेब जिवंत–इंजि.अशोक आंधळे

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम घेऊन दि.१२ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती एस.के.आंधळे–डोईफोडे तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे तसेच उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.राऊत सर,श्रीमती घुले मॅडम,श्रीमती चांदेकर मॅडम, श्रीमती टकले मॅडम आदीजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार,फुले वाहून अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये प्रथम, द्वितीय,तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रजिस्टर,पेन,पॅड आदी शालेय साहित्य बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब त्यांच्या कार्यामुळे तुमच्या आमच्या मनात आजही जिवंत आहेत असे विचार व्यक्त करून जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केले. अध्यक्षीय समारोपर विचार शाळेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती एस.के.आंधळे मॅडम यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील सर यांनी केले व उपस्थितांचे आभार धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## रविवारी देवडी येथे अ. भा. मराठी पत्रकार परिषदेची राज्यस्तरीय बैठक, पुरस्कार वितरण

**पद्मश्री पोपटराव पवार, मंगेश चिवटे, विशाल परदेशी, मिलिंद अष्टीवकर यांची उपस्थिती**

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक, बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान आणि स्वातंत्र्य सैनिक माणिकराव देशमुख यांच्या नावानं देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण असा भरगच्च कार्यक्रम रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील देवडी येथील माणिकबागेत होत आहे.. आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, उपमुख्यमंत्र्यांचे आरोग्य कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, न्यूज १८ लोकमतचे प्रसिध्द अँकर विशाल परदेशी, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होत आहे अशी माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली.. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात दर तीन महिन्यांनी परिषदेची बैठक होते.. यावेळेस प्रथमच बीड जिल्ह्यातील एका खेड्यात ही बैठक होत असल्यानं राज्यभर बैठकीची चर्चा आहे.. बैठकीला जोडूनच बीड जिल्ह्याच्या जडणघडणीत ज्या पत्रकारांचे योगदान राहिले आहे अशा पाच ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे.. दिव्यांगांना न्याय मिळवून देणारे दीपक कैतके आणि मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे तसेच बीड जिल्ह्यातील आदर्श शेतकरी कल्याणराव कुलकर्णी या बीड जिल्ह्याच्या सुपूत्रांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे..माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्यावतीने समाजसेवा, पत्रकारिता आणि कृषी क्षेत्रात योगदान देणाऱ्या तीन मान्यवरांचा सन्मान पद्मश्री पोपटराव पवार, मंगेश चिवटे, विशाल परदेशी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे किसानपुत्र चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारे आणि आयुष्यभर चळवळीसाठी मोठे योगदान देणारे अमर हबीब, अगोदर दैनिक मराठवाडा आणि नंतर माजलगाव समाचारच्या माध्यमातून आदर्श पत्रकारिता करणारे ज्येष्ठ पत्रकार सुहास देशमुख आणि अनेक अडचणींवर मात करून शेतीत नवनवे प्रयोग करणारे देवडी येथील आदर्श शेतकरी गोरख झाटे यांना अनुक्रमे समाजभूषण, पत्रभूषण आणि कृषी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे..सकाळी ११ ते १ पर्यत पुरस्कार वितरण सोहळा होईल आणि दुपारी २ वाजता परिषदेची परिषदेची बैठक होईल अशी माहिती परिषदेच्यावतीने देण्यात आली आहे.. कार्यक्रमाची जोरदार तयारी टीम बीड आणि टीम वडवणी करीत आहे.. पुरस्कार वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडियाचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, विभागीय संघटक सुभाष चौरे, वडवणी तालुका अध्यक्ष सतीश सोनवणे आणि स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या सरचिटणीस शोभना देशमुख यांनी केले आहे.

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म–मृत्यु नोंदणी/कावि
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पाटोदा
दि. ई स्वाक्षरीत

### जाहिरनामा

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

पाटोदा तालुक्यातील सर्व जनतेस जाहिर केले जाते की, अर्जदार वाणी शितल रत्नाकर रा. चुंबळी ता. पाटोदा जि. बीड यांनी त्यांचा जन्म दिनांक ०३/०२/२००७ रोजी मोजे तांबाराजुरी येथे झाला आहे. त्याच्या जन्माचे आदेश मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्गाचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास सगजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ई स्वाक्षरीत रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार, पाटोदा**

# महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांतील पशुपालकांना मोफत चारा

पुणे : शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांना आत्महत्या करण्यापासून रोखण्यासाठी सरकारकडून अनेक योजना राबवल्या जात आहेत. अलिकडेच महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा यांसारख्या म्हणजे ज्याठिकाणी शेतकरी आत्महत्येचं प्रमाण जास्त आहे अशा भागात सरकारने एक विशेष योजना सुरु केली आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या (एनडीडीबी) मदतीने हि योजना राबवली जात असून या योजनेअंतर्गत, पशुधन जपणाऱ्या शेतकऱ्यांना उच्च जातीच्या गायी आणि म्हशी तसेच चारा उपलब्ध करून दिला जाईल.

याशिवाय, चारा कापण्यासाठी आणि त्यापासून सायलेज बनवण्यासाठी यंत्रे देखील उपलब्ध करून दिली जातील. एनडीडीबी सोबत मदर डेअरी देखील या कामात सहभागी असेल. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि पर्यावरण आणि पशुसंवर्धन राज्यमंत्री पंकजा मुंडे यांच्या



बैठकीत या योजनेला अलीकडेच मंजुरी देण्यात आली. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील पशुधन असलेल्या शेतकऱ्याचा चाऱ्याचा प्रश्न मिटला आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत असे ठरविण्यात आले की, या योजनेअंतर्गत, पशुपालकांना वर्षातून १२ महिने उपलब्ध असलेल्या चारा उत्पादनासाठी अनुदान दिले जाईल. इलेक्ट्रिक चारा कापणी यंत्रे आणि सायलेज यांचेही वाटप केले जाईल. शेतकऱ्यांना आधुनिक दुग्ध व्यवस्थापन पद्धतींची ओळख करून देऊन उत्पादकता आणि उत्पन्न सुधारण्यासाठी प्रशिक्षित केले जाईल.

हि योजना विशेषतः महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा भागातील पशुपालकांसाठी उपयुक्त आहे कारण याठिकाणीच शेतकरी आत्महत्याचे प्रमाण जास्त आहे. सरकारला आशा आहे की दुग्ध उद्योग या भागातील कृषी संकट कमी करण्यास आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत करेल. या योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना उच्च उत्पन्न देणाऱ्या गायी आणि म्हशी तसेच दुधाचे चरबी आणि (घन पदार्थ-मुक्त चरबी) प्रमाण वाढविण्यासाठी पशुपालन पूरक आणि आहारातील पूरक आहार मिळावा यासाठी विशेष काळजी घेतली जाईल.

## थंडीच्या दिवसांत वेलवर्गीय पिकांचे पाणी व्यवस्थापन



वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी पाणी व्यवस्थापन करताना, पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि उपलब्ध जलस्रोतांनुसार (पाऊस, विहीर, कालवा) नियोजन करणे आवश्यक असते. सध्या थंडीचे दिवस असल्याने या काळात पाणी व्यवस्थापन कसे असावे याची माहिती घेतल्यास फायदा होतो.

वेलवर्गीय भाजीपाला पिके जरी पाण्याचा ताण सहन करु शकत असली तरी किफायतशीर उत्पादन मिळविण्याकरिता वेलवर्गीय भाजीपाला पिकांना पाण्याचे व्यवस्थापन करताना वातावरणातील तापमान, जमिनीचा मगदूर आणि पिकाची अवस्था यानुसार पाणी द्यावे. शक्यतो सहा ते आठ दिवसांनी पिकाला पाणी द्यावे. शक्य असल्यास ठिबक सिंचन पध्दतीने पिकाला पाणी द्यावे. प्रती दिवस १ तास संच चालू ठेवावा. पिकाची वाढीची अवस्था, फुलधारणा, फळधारणा या संवेदनशील अवस्थेत कोणत्याही परिस्थितीत पाण्याचा ताण पडू देऊ नये. अन्यथा वाढीवर, फळ पोसण्यावर परिणाम होतो आणि उत्पादनामध्ये घट येते.

## हिवाळ्यात शेळ्यांची काळजी

हिवाळ्याचा काळ शेळ्यांसाठी खूप आव्हानात्मक असतो. यावेळी, त्यांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची आणि थंडीपासून तणाव कमी करण्याची गरज आहे. शेळ्यांच्या आरोग्यासाठी आणि आरामासाठी योग्य काळजी, भोजन आणि व्यवस्था करावी लागते. जर तुम्हीही शेळ्या पाळण्याचा विचार करत असाल तर आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला शेळ्या पाळण्याच्या काही खास पद्धती सांगणार आहोत.

हिवाळ्याचा काळ शेळ्यांसाठी खूप आव्हानात्मक असतो. यावेळी, त्यांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची आणि थंडीपासून तणाव कमी करण्याची गरज आहे. शेळ्यांच्या आरोग्यासाठी आणि आरामासाठी योग्य काळजी, भोजन आणि व्यवस्था करावी लागते. जर तुम्हीही शेळ्या पाळण्याचा विचार करत असाल तर आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला शेळ्या पाळण्याच्या काही खास पद्धती सांगणार आहोत.



शेळ्यांची योग्य काळजी घेण्यासाठी चांगल्या घराची गरज असते. हिवाळ्यात, शेळ्यांना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उबदार निवारा आवश्यक असतो. त्यांच्या निवासस्थानाचे उत्तरेकडील वाऱ्याच्या प्रवाहापासून संरक्षण करणे सर्वात महत्वाचे आहे. शेळ्यांची त्वचा नैसर्गिकरित्या जाड असते, जी त्यांना थंडीशी सामना करण्यास मदत करते आणि संरक्षणात्मक कवच म्हणूनही काम करते. या जाड त्वचेमुळे शेळ्यांच्या शरीरातील हवेचा तीव्र प्रवाह कमी होतो आणि शरीरात हलका ओलावा टिकून राहतो.

अन्न आणि पेय : शेळ्यांना हिरवा चारा सोबत तेलाची पोळी, मोहरीचे तेल द्यावे. मोहरीच्या तेलामुळे शेळ्यांच्या शरीराला ऊब मिळते. याशिवाय केकसोबत अल्फा किंवा मिश्रित गवतही शेळयांच्या आरोग्यासाठी चांगले असते.

कोकरांची काळजी घ्या : कोकरांना जन्म देणाऱ्या शेळ्यांना हिवाळ्यात विशेष काळजी आणि निवारा आवश्यक असतो. लहान मुलांना त्यांच्या शरीराचे तापमान उबदार ठेवण्यासाठी त्यांच्या आईची गरज असते. अशा परिस्थितीत शेळ्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

## वाढत्या थंडीत रब्बी पिकांसह फळबागेची काळजी

मागील काही दिवसांत तापमानात चांगलीच घसरण झाली आहे. त्याचा रब्बी पिकांसह फळपिकांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी राज्यातील विविध कृषी विद्यापीठांतील तज्ज्ञांनी सल्ला दिलेला आहे.

हरभरा : यंदा लांबलेल्या पावसामुळे बहुतांश भागात हरभरा लागवडीस विलंब झाला. हिवाळ्यातील १५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान हरभरा पिकासाठी पोषक ठरते. मात्र तापमान १५ अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास हरभरा पिकामध्ये परागीकरणाच्या प्रक्रियेवर परिणाम होऊन घाटे भरले जात नाहीत. घाटे भरले तरी पोचट राहतात. पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. पीक वाढीवर झालेल्या परिणामामुळे पिकाची वाढ मंदावून खुंटते. घाटे कमी भरले जाऊन एकूण उत्पादनावर परिणाम होतो.

गहू : गहू पीक वाढीसाठी ७ अंश ते २१ अंश सेल्सिअस तापमान हे पोषक मानले जाते. सद्यःस्थितीत वातावरण गहू पिकासाठी अत्यंत पोषक आहे. परंतु तापमानामध्ये जास्त घट झाल्यास गव्हाच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता असते. तापमान ७ अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास काही कालावधीसाठी पिकाची वाढ कमी होते. तापमान ४ अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास पिकामध्ये 'कोल्ड इंजुरी' होण्याची शक्यता असते. त्यामुळे पिकाची वाढ खुंटणे, फुटवे येणे थांबणे, असे परिणाम दिसून येण्याची शक्यता असते.

करडई : सध्या करडई लागवड होऊन साधारणपणे ४० ते ४५ दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. हिवाळ्यात कमी झालेले तापमान करडई पिकासाठी पोषक असते. फांद्या फुटण्याच्या अवस्थेतील पिकास सद्यःस्थितीत कमी झालेले तापमान अधिक पोषक ठरते. करडईची लुसलुशीत पानांवर प्रादुर्भाव करणाऱ्या पाने खाणारी अळी आणि मावा किडीस अति थंडीमुळे नैसर्गिकरीत्या रोखले जाते.

भाजीपाला पिके : रब्बी हंगामात तापमान खूपच कमी झाल्यास भाजीपाला बियाण्यांची उगवण क्षमता कमी होते. काही वेळा उगवणदेखील



होत नाही. भाजीपाला पिकांच्या वाढीवर कमी झालेल्या तापमानाचा प्रतिकूल परिणाम होतो. कमी तापमानामुळे फुलधारणा व फळधारणा कमी प्रमाणात होते. अचानक तापमान कमी झाल्यामुळे टोमॅटो पिकामध्ये फळांना तडे जातात. त्यामुळे फळांचा दर्जा खालावतो. कांदा पिकामध्ये अतिथंडीमुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. वांगी पिकाची वाढ खुंटते, पाने सुकून करपल्यासारखी दिसतात. मावा, फुलकिडे या रस शोषणाऱ्या किडींचा तसेच बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

लिंबूवर्गीय फळपिके : तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यानंतर उष्ण आणि समशीतोष्ण कटिबंधातील फळझाडांची कार्यशक्ती कमी होते. त्यापेक्षाही तापमान कमी झाले तर झाडांच्या पानांना इजा होऊन ती वाळल्यासारखे दिसतात. फळांना भेगा पडतात व ती काळी पडतात. खोड व फांद्यांचा मध्यभाग काळपट होतो. परंतु बाहेरील साल सुस्थितीत असते. ही इजा मुख्यत्वे रोपवाटिकेतील रोपांना इजा होते. खोडाची जमिनीलगतची साल फाटते. अति थंडीमुळे पेशीतील पाणी गोठल्यामुळे पेशी फाटतात, मुळांना तडे जातात. खूप कमी तापमानात (१ ते २ अंश सेल्सिअस) झाडास चिलिंग इंजुरी होते. तापमान गोठणबिंदूच्या खाली गेल्यास झाडाला फ्रीजिंग इंजुरी होते. त्यामुळे पाणी आणि अन्नद्रव्यांच्या वहनामध्ये अडथळा येतो.

द्राक्ष : द्राक्ष बागेतील किमान तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास वेलीच्या शरीरशास्त्रीय क्रियांचे संतुलन बिघडते. मण्यातील हिरवे रंगद्रव्य गुलाबी रंगात बदलू शकते, या समस्येला गुलाबी मणी (पिंक बेरी) म्हणतात. ही विकृती टाळण्याकरिता घड पेपरने झाकून घ्यावेत. त्यामुळे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. वाढत्या थंडीमध्ये घडामधील वाटाण्याइतक्या आकाराचे हिरवे मणी तडकणे अशा समस्या दिसून येतात. तसेच वाढत्या थंडीमध्ये भुरीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. सध्याच्या ढगाळ वातावरणामध्ये असणारा कमी तीव्रतेचा सूर्यप्रकाश भुरीसाठी पोषक ठरतो. सध्या फुलोऱ्यामध्ये असलेल्या बागांमध्ये भुरीसाठी आंतरप्रवाही बुरशीनाशकांचा वापर प्रभावी ठरतो.

केळी : तापमान १२ ते १३ अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास केळीची फळे, झाडे किंवा पानांना चिलिंग इंजुरी (थंडीमुळे इजा) होण्याची शक्यता असते. वाढत्या थंडीमुळे मुळ्यांच्या अन्न व पाणी शोषणाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. अन्नद्रव्यांचे शोषण व वहन योग्यरीत्या न झाल्याने पाने पिवळसर दिसतात. नवीन येणाऱ्या पानाची पुंगळी उलगडण्यास वेळ लागतो. पुंगळीच्या बाहेरील बाजूवर चट्टे दिसून येतात. एकूण वाढ कमी झाल्यामुळे केळफूल बाहेर पडण्यास उशीर लागतो. केळी घड अडकतात. घड कमी भरतात. थंडीमुळे केळीची साल काळी पडणे किंवा तपकिरी डाग पडणे. साल निस्तेज, राखाडी किंवा काळी पडणे. फळे न पिकणे किंवा असमान पिकणे किंवा कडकपणा वाढणे अशा समस्या दिसून येतात. यंदा अनुकूल हवामानामुळे केळी बागांमध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढलेला दिसून येत आहे. बागेतील करपा रोगग्रस्त पाने किंवा पानाचा रोगग्रस्त भाग बागेबाहेर नेऊन नष्ट करावा. नियंत्रणासाठी शिफारशीत बुरशीनाशकांचा आलटून- पालटून फवारणीद्वारे वापर करावा.

केसर आंबा : दरवर्षी केसर आंब्यामध्ये जूनमध्ये आलेली पालवी पक्व होऊन पुन्हा ऑगस्टच्या शेवटी किंवा सप्टेंबरच्या सुरुवातीस त्यावर पालवी येते. अशा पालवीवर पॅक्लोब्युट्राझोलचा वापर केला असल्यास थोडीफार थंडी सुरू झाली तरी दहा ते पंधरा नोव्हेंबरच्या दरम्यान मोहर येणे सुरू होते. तो मोहर नोव्हेंबरच्या शेवटपर्यंत पूर्ण बाहेर येतो. परंतु या वर्षी पाऊस, ढगाळ वातावरण आणि हवेत गारवा राहिल्याने ऑगस्ट, सप्टेंबरची पालवी आलेली नाही. ऑक्टोबरच्या शेवटी ऊन पडायला लागल्यानंतर काही बागांमध्ये थोडीफार पालवी आली. तर काही बागांमध्ये त्याच काडीवर अतिशय थोडाफार मोहर सुरू झाला. नोव्हेंबर महिन्यातही थंडीचे प्रमाण बऱ्यापैकी होते.

करावयाचे उपाय : फळझाडाच्या खोडाजवळ व आळ्यात तनिस, गवत, पालापाचोळा, गव्हाचे तूस इत्यादींचे आच्छादन करावे. रात्रीच्या वेळी फळबागेत ठिकठिकाणी ओला पालापाचोळा पेटवून धूर करावा. त्यामुळे बागेतील तापमान वाढीस मदत मिळते. पालाशयुक्त खते, वरखते, म्युरेट ऑफ पोटॅश यांच्या मात्रा दिल्यास फळझाडाची पाणी व अन्नद्रव्ये शोषणाची क्षमता वाढते. फळबागेच्या पश्चिम व दक्षिण दिशेने वारा प्रतिबंधक वृक्षांची लागवड करावी. त्यामुळे शीतलहरींपासून बागेचे संरक्षण होते. तसेच बागेभोवती मध्यम उंचीच्या कुंपण झाडांची लागवड करावी. या झाडाची सतत निगा व छाटणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८७ : ला पेनसिल्वेनिया हे अमेरिकेचेसंविधानस्विकार करणारे दुसरे राष्ट्र बनले.
१७५५ : डच इस्ट इंडिया कंपनीचे निकोबार येथे आगमन
१८०० : ला वॉशिंग्टन डीसी अमेरिकेची राजधानी बनले.
१८८२ : अनंदमठ या बंकिमचंद्र यांच्या कादंबरीचे प्रकाशन, याच कादंबरीमध्ये वंदे मातरम्? हे गीत आहे.
१८८४ : ला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांमध्ये क्रिकेट सामना खेळला गेला जो अधिकृत रित्या पहिला होता.
१९०१ : जी. मार्कोनी याला प्रथमच बिनतारी संदेशाचे अटलांटिक महासागर पार प्रक्षेपण करण्यात यश मिळाले.
१९११ : दिल्ली ही भारताची राजधानी करण्यात आली. या आधी कोलकाता ही भारताची राजधानी होती.
१९११ : ला जॉर्ज पाचवा भारतामध्ये आला होता.
१९१७ : ला इटली येथील फ्रेंच आल्प्स येथे फ्रान्स च्या सैन्याची रेल्वे रुळावरून रेल्वे घसरून ५४३ लोकांचा मृत्यू.
१९२३ : ला इटलीच्या गंगा मानल्या जाणाऱ्या नदीवरील बांध फुटल्यामुळे ६०० च्या जवळपास लोक मारल्या गेले होते.
१९३६ : ला चीन चे नेता च्यांग काई शेक यांनी जपान विरुद्ध युद्धाची घोषणा केली होती.
१९५८ : ला जिनिया हा देश संयुक्त राष्ट्र संघाचा सदस्य बनला.
१९६३ : ला केनियाला स्वातंत्र्य मिळाले.
१९७१ : संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करण्यात आले.
१९९० : ला टी. एन. शेषन हे भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त बनले.
१९९६ : ला भारत आणि बांग्लादेश यांच्या मध्ये ३० वर्षापर्यंत गंगेचे पाणी वाटण्याच्या करारा वर सह्या झाल्या होत्या.
२००१ : पृथ्वी या क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली.
२००१ : आशा भोसले यांना दादासाहेब फाळके पुरस्कार
२००१ : ला भारताने नेपाळ ला दोन चीता हेलिकॉप्टर आणि काही अवजारे दिली होती.
२००८ : ला कर्नाटक चे माजी मुख्यमंत्री एम वीरप्पा मोइली यांनी सरकारी कर्मचारी यांच्या सेवा मंडळांमध्ये बदलाव करण्यासाठी शिफारस केली.
२०१६ : प्रियांका चोप्रा यांना युनिसेफ सदिच्छा दूत म्हणून नेमण्यात आले.
२०२१ : हरनाज कौर संधूने मिस युनिव्हर्स २०२१ जिंकली

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८१ : वॉर्नर ब्रदर्स चे सहसंस्थापक हॅरी वॉर्नर यांचा जन्म. (मृत्यू: २५ जुलै १९५८)
१८७२ : डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे राजकीय नेते, हिन्दू महासभेचे संस्थापक, अध्यक्ष आणि सरचिटणीस, लष्करीकरणाचे प्रवर्तक आणि नाशिक येथील 'भोंसला मिलिटरी स्कूल'चे संस्थापक (मृत्यू: ३ मार्च १९४८)
१८९२ : गौरीशंकर गोवर्धनराम जोशी तथा 'धूमकेतू' गुजराथी कथाकार व कादंबरीकार. त्यांच्या ७ उत्कृष्ट कथांचा संग्रह 'सप्तपर्ण' या नावाने प्रकाशित झाला आहे. (मृत्यू: ११ मार्च १९६५)
१९०५ : डॉ. मुल्कराज आनंद लेखक (मृत्यू: २८ सप्टेंबर २००४)
१९०७ : खेमचंद प्रकाश संगीतकार (मृत्यू: १० ऑगस्ट १९५०)
१९१५ : फ्रँक सिनात्रा हॉलिवूड मधील अभिनेते व गायक (मृत्यू: १४ मे १९९८)
१९१९ : ला भारतीय क्रिकेटर भाऊसाहेब निंबाळकर यांचा जन्म.
१९२७ : इंटेल कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक रॉबर्ट नोयस यांचा जन्म. (मृत्यू: ३ जून १९९०)
१९४० : शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री, संरक्षण मंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
१९४५ : संसद आणि लोकसभेचे सदस्य माजीद मेमन यांचा जन्म.
१९४९ : महाराष्ट्राचे लोकनेतेगोपीनाथ पांडुरंग मुंडेयांचा जन्म.
१९४९ : तमिळ तसेच हिंदी चित्रपटांचे अभिनेते रजनीकांत यांचा जन्म.
१९५२ : भारतीय कॅनेडियन व्यापारी आणि राजकारणी हरब धालीवाल यांचा जन्म.
१९५४ : मुंबई येथे २६/११ च्या झालेल्या दहशदवादी हल्यात शहीद झालेले हेमंत करकरे यांचा जन्म.
१९७३ : मराठी चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध सुपर स्टार भरत जाधव यांचा जन्म.
१९७८ : मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार उमेश कामत यांचा जन्म.
१९८१ : युवराजसिंग भारतीय क्रिकेटपटू
१९८४ : मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार संतोष जुवेकर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३० : परदेशी मालाविरुद्ध निदर्शने करताना हुतात्मा बाबू गेनू याचा मोटारीखाली चिरडून मृत्यू (जन्म: ? ? १९०८)
१९६४ : मैथिलिशरण गुप्त हिन्दी कवी. त्यांचे सुमारे ४० स्वतंत्र ग्रंथ आणि ६ अनुवादित ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हणून मान्यता मिळाली. (जन्म: ३ ऑगस्ट १८८६)
१९९१ : दत्तात्रय गणेश तथा अप्पासाहेब शेंबेकर शेतीतज्ज्ञ व बागाईतदार, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे संस्थापक अध्यक्ष (१९६३ १९६६)
१९९२ : पं. महादेवशास्त्री जोशी साहित्यिक, भारतीय संस्कृतीकोषाचे व्यासंगी संपादक (जन्म: १२ जानेवारी १९०६ आंबेडे, सातेरी, गोवा)
२००० : जयदेवप्पा हलप्पा तथा जे. एच. पटेल कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री (३१ मे १९९६ ७ आक्टोबर १९९९) (जन्म: १ आक्टोबर १९३०)
२००५ : रामानंद सागर हिन्दी चित्रपट निर्माते (जन्म: २९ डिसेंबर १९१७)
२००६ : सीगेट टेक्नोलॉजी चे सहसंस्थापक ॲलन शुगर्ट यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९३०)

cmyk



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत





## थोडक्यात



### दोन्ही शेतकऱ्याचा वाद मिटून शेतात जाणारा रस्ता मोकळा

अंबड। प्रतिनिधी

नायब तहसीलदार एकनाथ भोजने यांनी स्वतः शेतामध्ये जाऊन दोन शेतकऱ्यांमध्ये शेतीचा रस्ता वादातून असलेला वाद मिटून रस्ता मोकळा करून दिला व तसेच शेतकऱ्यांनी महसूल कर्मचारी अधिकाऱ्यांचा आभार व्यक्त केले. शेतातला रस्ता रस्ता मोकळा करून देण्याबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या सदरील प्रकरणी मौजे साडेसावंगी येथील गट क्रमांक ८२ मधून गट क्रमांक ८७ मध्ये विहिरीवर जाण्यासाठी रस्ता पाहणी करून वादी व प्रतिवादी दोघेही हजर असून दोघांमध्ये तोडजोड करून रस्ता मोकळा करून देण्यात आला.श्री एकनाथ भोजने नायब तहसीलदार अंबड व तलाठी श्री किशोर गायकवाड यांनी वरील प्रमाणे वादी व प्रतिवादी यांची तडजोड करून रस्ता दोन्हीही शेतकऱ्याच्या संमतीने रस्ता पुणे वापरण्यास सुरू करण्यात आला.

### एक भारत श्रेष्ठ भारत शिबिरातून राष्ट्रीय एकता आणि अखंडता मजबूत होईल -डॉ. पोपटराव पवार

अहिल्यानगर। प्रतिनिधी

१७ महाराष्ट्र बटालियन नॅशनल कॅडेट कॉर्प्स तर्फे ''एक भारत श्रेष्ठ भारत'' शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरातील कॅडेट्सने शुक्रवार ता. १२ डिसेंबर रोजी आदर्शगाव हिवरेबाजार येथे भेट दिली. यावेळी पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी उत्साही कॅडेट्सचे स्वागत केले.

कॅडेट्सना संबोधित करताना त्यांनी शिस्त आणि देशप्रेम हे गुण विकसित करण्यासाठी नेतृत्व, सौहार्द, संघकार्य, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि श्रमप्रतिष्ठा अशी मूल्ये शिस्तबद्ध आणि तत्त्वनिष्ठ जीवनाचा पाया बनतात. एन.सी.सी कॅडेट्स उद्याचे भविष्यातील आदर्श आणि जबाबदार नागरिक बनून राष्ट्रीय एकता आणि अखंडता मजबूत होईल असे प्रतिपादन केले. तसेच त्यांनी जलसंधारण, पाणलोट विकास वृक्षारोपण, मृदसंधारण, आपत्ती व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, पाण्याचा ताळेबंद इत्यादी विषयावर मार्गदर्शन करून खेड्याकडे चला हा मुलमंत्र दिला. यावेळी कमांडिंग अधिकारी कर्नल प्रसाद मिजार, सरपंच विमलताई ठाणगे, जेसीओ सुभेदार यशवंत सिंग,ए.एन.ओ भारत होळकर, मंगेश ठाणगे मेजर, राज ठाणगे मेजर आणि पी. आय स्टाफ उपस्थित होते.

### अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना ४१ कोटींचा निधी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

राज्यातल्या पात्र ठरलेल्या ४ जिल्हा परिषदा, ४० पंचायत समित्या आणि २१,५५१ ग्राम पंचायतींना पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अबंधित निधीच्या स्वरूपातील पहिल्या हप्त्याचा केंद्र शासनाकडून मुक्त करण्यात आलेला ७१७.१७ कोटी रूपये इतका निधी वितरीत करण्यात येत आहे. त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील १२१८ ग्रामपंचायतींना ४१ कोटी १४ लाख ५४ हजार २६४ रूपयांच्या निधीचा समावेश आहे. या निधीमुळे गावागावांत विकास कामांना वेग येणार आहे.शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची राहील. वरील प्रक्रियेमध्ये गावातील सद्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून गावाच्या गरजांची निश्चिती करून कामे ठरविण्याचे अधिकार ग्रामसभा व ग्रामपंचायतीला आहेत. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अबंधित निधीचा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजेनुसार आवश्यक बाबींवर वापर करावा. तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, सदर अनुदानाचा वापर राज्य शासनाने मंजूर केलेल्या बाह्य संस्थांकडून करण्यात येणाऱ्या लेखा परिक्षणासाठी करू शकतात.

दिनांक:-११-१२-२५

### खोटया आणि बदनामीकारक आरोपांचे उत्तर

डॉ. सामी फैसल बिनमाझी (डॉ. बेटु भैय्या) माझ्या प्रिय पुतण्याच्या अंतिम शवविच्छेदन (पोस्टमॉर्टम) अहवालात मृत्युचे कारण नैसर्गिक हृदयविकार असल्याचे वैद्यकीय दृष्टया सिध्द झाले आहे. पुतण्या आणि डॉ. सामी यांचे मोठे भाऊ सिरहान फैसल बिनमाझी यांनी माझ्या आणि माझ्या मुलाविरुध्द डॉ. सामी यांची हत्या केल्याचा केलेला आरोप वैद्यकिय दृष्टया निराधार आणि खोटा असल्याचे सिध्द झाले आहे. हा खोटा आरोप सिरहान फैसल बिनमाझी यांनी व्हॉटसअप व सोशल मिडीयाच्या विविध ग्रुपवर पसरवला.

स्वाक्षरित

**तारेख मुबारक बिनमाझी अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६३८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २७/१०/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुमन भ्र दत्तात्रय मेरगळ सर्व्हे नं.-३५ प्लॉट नं.५ सिटी सर्व्हे नं. १८६४/क-५ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- याच प्लॉट मधील भाग
पश्चिम : याच प्लॉट मधील भाग
दक्षिण- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः सर्व्हे न.३५ मधील जमीन

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिला आंदोलनाचा इशारा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धाडले पत्र, मागणी काय?

अहिल्यानगर। प्रतिनिधी

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी लोक आयुक्त विधेयकासाठी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून थेट तारीखच मान्य केली आहे. विधानसभा अन्? विधान परिषदेत विधेयक मंजूर जाल्यानंतरही अद्याप अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे अण्णा हजारे यांनी उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे. अण्णा हजारे यांनी देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत लोक आयुक्त विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी उपोषण करणार असल्याची माहिती दिली. लोकायुक्त कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अण्णा हजारे पुन्हा आमरण उपोषण करणार आहेत. ३० जानेवारी २०२६ पासून अहिल्यानगरमधील राळेगणसिद्धी येथील यादव बाबा मंदिरामध्ये अण्णा हजारे उपोषण करणार आहेत.

२८ डिसेंबर २०२२ रोजी विधानसभेत आणि १५ डिसेंबर २०२३ रोजी विधानपरिषदेत विधेयक मंजूर झाले आहे. तरीही अद्याप याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे अण्णा हजारे यांनी उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. विधेयक मंजूर होऊन दोन वर्षाचा कालावधी उलटून गेला. अंमलबजावणी करण्याची सरकारची इच्छा दिसत नाही, त्यामुळे उपोषण करणार असल्याचे अण्णा हजारे यांनी पत्रात म्हटले आहे.

राज्यात सशक्त लोकायुक्त कायदा करावा यासाठी २३ मार्च २०१८ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर सात दिवसांचे उपोषण करण्यात आले आणि त्यानंतर ३० जानेवारी २०१९ रोजी राळेगणसिद्धीच्या यादबबाबा मंदिरात सात दिवसांचे उपोषण करण्यात आले होते. त्यानंतर आपण कायदा करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शासनाचे पाच सदस्य आणि सिव्हिल सोसायटीचे पाच सदस्य अशी संयुक्त मसुदा समिती स्थापन करून सदर समित्याच्या ९ बैठका होऊन लोकायुक्त कायद्याचा मुसदा तयार करण्यात आला.

२८ डिसेंबर २०२२ रोजी राज्याच्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक विधानसभेमध्ये मंजूर करण्यात आले. त्यानंतर १५ डिसेंबर २०२३ रोजी राज्याच्या विधानपरिषदेच्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक मंजूर करण्यात आले. २० डिसेंबर २०२४ रोजीच्या आपल्या पत्रात सदर लोकायुक्त विधेयकास राज्यपाल महोदयांनी मान्यता दिली आहे आणि सदर विधेयक मा. राष्ट्रपती महोदयांच्या मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले असून त्यासाठी आवश्यक पाठपुरावा शासन करत आहे असे पत्रात नमुद केले आहे.

परंतू आपण पाठवलेल्या पत्राला एक वर्षा पेक्षा अधिक कालावधी आणि कायदा विधानपरिषदेमध्ये मंजूर होऊन दोन वर्षाचा कालावधी झाला आहे. मात्र अद्यापही राज्यात सशक्त लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी झालेली नाही. कारण हा काही माझा वैयक्तिक प्रश्न नाही. देशातील जनतेचा प्रश्न आहे. देशातील भ्रष्टाचाराला रोखण्याचा प्रश्न आहे. एवढा प्रदीर्घ काळ झाल्यानंतरही लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी होत नाही, यावरून हे स्पष्ट होते की, राज्यात लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी करण्याची सरकारची इच्छा दिसत नाही. त्यामुळे मी विचार केला की, हार्ट अटॅकने मृत्यु येण्यापेक्षा देश आणि समाजाच्या हितासाठी मृत्यु आला तर ते माझे भाग्य समजेन.

म्हणून आपणास स्मरण करून देत आहे की, आपल्या सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी झाली नाही तर महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक मागणी मी राळेगणसिद्धी येथील संत यादवबाबा मंदिरामध्ये दिनांक ३० जानेवारी २०२६ पासून पुन्हा माझे आमरण उपोषण सुरू करीत आहे.

## अहिल्यानगर येथील गरीब रुग्णाला संकेत सानप यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत

अहिल्यानगर/मुंबई । प्रतिनिधी



सामाजिक बांधिलकी व लोकसेवा हाच आपला धर्म माणून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे निमोण गावातील संगमनेर तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील गरीब व गरजू कुटुंबातील रुग्ण सागर रघुनाथ मंडलिक यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ८० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

सागर रघुनाथ मंडलिक हे गेल्या काही काळापासून मेंदु रोग गंभीर आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता. याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ८० हजार रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली. डॉक्टर संजीव देसाई सीएनएस हॉस्पिटल नाशिक मायलान सर्कल मुंबई नाका नाशिक येथे सदर पेशंट वार्डात ॲडमिट आहेत निमोण तालुका संगमनेर येथील पेशंट सागर रघुनाथ रघुनाथ मंडलिक यांच्या मेंदू या आजारावरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ८० हजार रुपयाची तात्काळ मदत करण्यात आली. या मदतीमुळे निमोन येथील सागर रघुनाथ मंडले यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे. संकेत तुकाराम सानप यांनी यावेळी भावना व्यक्त करताना सांगितले की, गरीब, शेतकरी, मजूर, दिव्यांग आणि आजारपणाशी झगडणाऱ्या प्रत्येक गरजू कुटुंबासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा मोठा आधार आहे. शासनाच्या प्रत्येक योजना व मदतीचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे. सागर रघुनाथ मंडलिक यांना मदत मिळाल्याने माझ्या सेवाकार्यातील एक ध्येय साध्य झाल्यासारखे वाटते.

## जिल्ह्यात यलो अलर्ट जारी; नागरिकांनी थंडीच्या दिवसात योग्य ती दक्षता घ्यावी-जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

कुलाबा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. ११ ते १२ डिसेंबर २०२५ रोजीपर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. या दोन दिवशी तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. तरी जालना जिल्ह्यातील नागरिकांनी थंडीच्या दिवसात योग्य ती दक्षता घ्यावी, आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

जिल्ह्यात लाट येण्याची शक्यता असल्याने काय करावे व काय करू नये याची माहिती पुढीलप्रमाणे आहे. १. आवश्यकता असल्यास घराबाहेर जावे अन्यथा घरीच थांबावे. २. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उबदार कपडे आहेत याची खात्री करावी. ३. प्रसार माध्यमाव्दारे वेळोवेळी थंडीचा प्रतिकार करण्यासाठी दिलेली माहिती किंवा सूचना अमलात आण्याव्यात. ४. एकटे राहणाऱ्या वयोवृद्ध शेजारच्या व्यक्तींकडे लक्ष दयावे. ५. गरम राहणाऱ्या किंवा इमारतीमधील जास्त हवा न येणाऱ्या खोलीमध्ये वास्तव्य करावे. रूम हिटरचा वापर करावा. गरम पेय घ्यावे व शरीर उष्ण राहण्यासाठी व थंडीच्या लाटेचा प्रतिकार करण्यासाठी शरीराला तयार करावे. ६. विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास फ्रीज मधील खाण्याचे पदार्थ ४८ तास व्यवस्थित राहू शकतात फक्त त्याचा दरवाजा व्यवस्थीत लागतो का ते पहावे व जास्त वेळा उघडू नये. ७. थंडी पासून बचाव करण्यासाठी टोपी किंवा मफलरचा वापर करावा. ८. रॉकेल च स्टोव्ह किंवा कोळश्याची शेगडी वापरत असाल तर त्याचा धूर



जाण्यासाठी खिडकी उघडी असावी अन्यथा दुषित धुरामुळे बाधा होऊ शकते. ९. ताजे पदार्थ खावेत ज्यामुळे शरीरामध्ये उर्जा निर्माण होईल. मादक पदार्थ किंवा अल्कोहोल मिश्रित नसलेले पेय घ्यावेत. १० हिमबाधा झाल्याचे लक्षणे दिसताच डॉक्टरांना भेटावे. स्पर्श केल्यानंतर जाणीव होत नसल्यास किंवा हाताची बोटे, कानाची पाळी, नाकाचा शेंडा यांचा रंग पांढरा किंवा फिक्कट झाल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. खालील लक्षणे आढळल्यास तात्काळ डॉक्टरांना दाखववे -शरीर थंड पडणे. थंडी वाजणे. स्मृतीभ्रंश होणे. बोलतांना विसंगती किंवा अडखळणे, उच्चार स्पष्ट न करता येणे. अंधारी येणे, थकवा जाणवणे.

## भ्रष्टाचार प्रकरणी विस्ताराधिकारी चव्हाण मॅनेज?

### चौकशी अहवाल दाबण्याचा प्रयत्न, सीईओ मॅडम चौकशी करा

जालना। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराबाबत दाखल तक्रारीवर चौकशी होऊन दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल समोर येत नाही. हा सर्व प्रकार अंबड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी आत्माराम आसाराम चव्हाण यांच्याकडून होत आहे. तसेच विस्तार अधिकारी चौकशी प्रकरणी दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. याबाबात सीईओ मॅडम यांनी चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सदरील विस्ताराधिकारी चव्हाण हे अंबड पंचायतमध्ये ६ ते ७ वर्षापासून एका जागेवर ठाण मांडून बसलेले आहेत. याप्रकरणी चौकशी होणे गरजेचे आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम .मिन्नू यांनी अशा विस्ताराधिकारी चव्हाण यांची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे आहे. कारण अहवाल सादर न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास सचिव, विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद तसेच विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोनही मार्ग वापरून तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. अनेक तक्रारी दाखल झाल्या नंतर शेवटी जालना जिल्हा परिषद ने तक्रारीची दखल घेत जालना जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम. यांनी अंबड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे आदेश दिले. पुढे गटविकास अधिकाऱ्यांनी तपासाची जबाबदारी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी चव्हाण यांच्याकडे सोपवल्या नंतर पंचायत समिती विस्तार अधिकारी यांनी दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिकृत पत्रव्यवहार करून तक्रारदार व संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना नोटीस देण्यात आली. यानुसार ९ ऑक्टोबर २०२५ रोजी विस्तार अधिकारी चव्हाण यांनी ग्रामपंचायत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून एका जागेवर बसून पंचनामा केला. आवश्यक ग्रामपंचायतचे सर्व दप्तर हस्तगत करून सविस्तर तपासणी करून लवकरच अहवाल सादर केला जाईल असे विस्ताराधिकारी आत्माराम चव्हाण चौकशी अधिकाऱ्यांनी तक्रारदारांना सांगितले होते. परंतु दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल सादर झाला नसल्याची माहिती समोर आली आहे.

## महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांचा अभूतपूर्व प्रतिसाद -भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी, जालना महानगरतर्फे आगामी जालना महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज विक्री करण्याची प्रक्रिया शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा भाजपा जिल्हा कार्यालयात सुरू करण्यात आली. अर्ज वितरणाच्या पहिल्याच दिवशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून पहिल्याच दिवशी एकूण ३०७ इच्छुक उमेदवारी फॉर्मचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह राजेशजी राऊत, अशोक अण्णा पांगारकर, विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगीताई देशपांडे, अरुणा जाधव इत्यादी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, जालना महानगरपालिकेची आगामी निवडणूक असून भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी उत्साहाने सहभागी होत आहे. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि जनतेच्या अपेक्षांना प्राधान्य देणारे सक्षम उमेदवार देण्याचा भाजपा महानगराचा संकल्प आहे. अर्ज वितरणास मिळालेला आजचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता पक्ष संघटनेची भक्कम ताकद आणि जनतेचा भाजपावरील विश्वास अधिक दृढ असल्याचे दिसून येते.

जालना शहराचा विकास हा भाजपाचा केंद्रबिंदू मानून शहराच्या पुढील पाच वर्षांच्या विकासाचा अजेंडा तयार करून जालना महानगरपालिकेतील जनतेच्या दैनंदिन समस्या वीज, पाणी, स्वच्छता व सुंदर रस्ते याला प्राधान्य देणारी असेल व हे मुद्दे घेऊन आम्ही जनतेसमोर जाणार असून जनता निश्चितच या मुद्द्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या पाठीसी उभी राहून जालना महानगरपालिकेत भाजपा चे मोठ्या संख्येने उमेदवार निवडून देतील असा मला पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

## नाफेड,मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी लाच शिवाय केंद्राला मंजुरी देत नाही?-आ. लोणीकर

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्रात सोयाबीन व कापसाच्या हमीभाव खरेदीला सुरुवात झाल्याचे शासनाचे दावे असले तरी वास्तव चित्र पूर्णपणे वेगळे आहे. शेतमाल हमीभाव खरेदी केंद्रे नाममात्र सुरू असून शेतकऱ्यांचा माल मोठ्या प्रमाणात धान्य खरेदी व्यवस्थेच्या बाहेरच पडलेला आहे. या अडचणींवर विधानसभेत आमदार बबनराव लोणीकर यांनी आक्रमक पवित्रा घेत सरकारला धारेवर धरले. ''नाफेड व मार्केटिंग फेडरेशन येथील काही अधिकारी ४ लाख रुपये लाच दिल्याशिवाय खरेदी केंद्र मंजूरच होत नाही'' असा खळबळजनक आरोप लोणीकरांनी केला हमीभाव खरेदी केंद्र मंजुरीसाठी मागणी करणाऱ्या संस्थेने लेखी स्वरूपात आमदार बबनराव लोणीकरांकडे तक्रार केली असेल असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले.

तारांकित प्रश्नाद्वारे बोलताना आमदार लोणीकर यांनी शेतमाल हमीभाव खरेदी केंद्र मंजुरी संदर्भात भ्रष्टाचार उघड केला. त्यांनी सांगितले की, ''हमीभाव खरेदी केंद्र मंजुरीसाठी



डीएमओसह काही संबंधित अधिकारी सरळ ४ लाख रुपयांची लाच मागतात.'' आमदार लोणीकरांच्या या आरोपामुळे सभागृहात एकच खळबळ उडाली. शेतकरी अडचणीत असताना अधिकाऱ्यांची दादागिरी किती दिवस सहन करायची? असा सवाल देखील त्यांनी शासनाला विचारला.

खरेदी केंद्रांची संख्या अपुरी, तर सुरू असलेल्या केंद्रांतही खरेदीचा वेग कासवगतीचा असून यामुळे शेतकऱ्यांना मजबुरीने आपला माल कमी दराने विकावा लागला. अर्ध्यापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपला शेतमाल खूपच कमी भावात विकला असून सोयाबीन विक्री करताना शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० रुपयांचा तोटा झाला आहे. उरलेला माल तरी शासनाने तातडीने हमीभावाने खरेदी करावा अन्यथा शेतकऱ्यांचे अनमोल नुकसान होणार आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. वास्तव परिस्थिती ऐकूनच असह्य झाल्याचे सांगत लोणीकरांनी ठणकावले की, किमान ५० गावांसाठी एक तरी हमीभाव खरेदी केंद्र सुरू करा. शेतकरी दिवसेंदिवस त्रस्त होत आहेत आणि अधिकारी मात्र लाचखोरीत गुंग आहेत. खरेदी प्रक्रियेतील ढिलाई व भ्रष्टाचारावर त्वरित अंकुश आणण्याचे आवाहन त्यांनी सरकारला केले. ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकरी या मागण्यांकडे आशेने पाहत आहेत. खरेदी केंद्रांची संख्या वाढवून गतीमान खरेदी प्रक्रिया सुरू झाली तरच शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांची बाजू मांडल्याबद्दल अनेक शेतकऱ्यांनी फोनवरून आमदार बबनराव लोणीकरांच्या मागणीचा कौतुक करत अभिनंदन केले.

## धाराशिवमध्ये १४१ जणांना कुष्ठरोगाची लागण

धाराशिव। प्रतिनिधी

जिल्ह्यात आरोग्य विभागाच्या १६ दिवसांच्या कुष्ठरुग्ण शोध मोहिमेत तब्बल १५ लाख नागरिकांची तपासणी करण्यात आली. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान शहरी झोपडपट्टी भाग तसेच ग्रामीण भागातील सर्व घरांमध्ये मोहीम राबवली गेली. या तपासणीत १०,०७५ संशयित रुग्ण आढळून आले, त्यापैकी १४१ जणांना कुष्ठरोगाचे निदान झाले. यापैकी १६ टक्के रुग्ण म्हणजे सांसर्गिक प्रकारातील असून ८४ टक्के रुग्ण असांसर्गिक प्रकारातील आहेत.

आरोग्य विभागाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, प्रत्येक रुग्णाच्या संपर्कातील कमीतकमी ३० जणांची तपासणी केली जात आहे, आणि येत्या आठवडाभरात उर्वरित संशयितांचीही तपासणी पूर्ण होईल. मोहीमेअंतर्गत आढळलेल्या रुग्णांवर ताबडतोब उपचार सुरू करण्यात आले आहेत. सांसर्गिक प्रकारातील रुग्णांना १२ महिने तर असांसर्गिक प्रकारातील रुग्णांना ६ महिने औषधोपचार दिले जात आहेत. विभागाच्या म्हणण्यानुसार, वेळेवर उपचार घेतल्यास रुग्ण पूर्णपणे बरे होऊ



शकतात.कुष्ठरोग विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अंगावर चट्टे, हात-पायांमध्ये मुंग्या येणे, त्वचेवर तेलकटपणा, भुवयाच्या केस गळणे यासारखी लक्षणे दिसल्यास ताबडतोब जवळच्या आरोग्य केंद्रात दाखवा. मोहिमेदरम्यान आरोग्य विभागाने संशयित रुग्णांवर चट्ट्यावरील बधिरता, त्वचेवरील जंतू व मज्जातंतूची तपासणी करून कुष्ठरुग्ण ओळखले.मागील काही वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकली तर, २०२२ मध्ये २१३ रुग्ण, २०२३ मध्ये २४५ रुग्ण, २०२४ मध्ये ४४ रुग्ण, २०२५ मध्ये आतापर्यंत १४१ रुग्ण आढळले आहे. आरोग्य विभागाच्या सध्या सुरू असलेल्या मोहिमेमुळे कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यास मोठा हातभार लागणार आहे. विभागाने २०२७ पर्यंत जिल्ह्यात कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

cmyk

# केंद्राचे पथक प्रत्यक्ष गावात पाहणी करू लागले अन् अधिकाऱ्यांच्या बुडाला आग लागली!

## स्वच्छ भारत मिशन या बोगस प्रशिक्षणाचीही चौकशी सुरु; संस्थाचालक पळाला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये जवळपास १०८७ गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे चालू आहेत. दोन वर्षापासून शंभर कामे ही पूर्ण झाली नाहीत. मात्र अधिकाऱ्यांनी कागदोपत्री आकडे वाढवून कामे पूर्ण झाल्याचे दर्शवल्याने आणि केंद्रीय समितीच्या पथकाने प्रत्यक्ष गावात जाऊन कामे पाहणी सुरू केल्याने बोगस आकडेवारी वाढवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बुडाला आग लागली असून आता ते समितीच्या विरोधात काड्या करू लागले आहेत. केवळ अभिलेख तपासणीच नव्हे तर प्रत्यक्ष गावात जाऊन भेटी देण्याचे ही समितीला अधिकार असल्याने समिती आता प्रत्यक्ष गावात जाऊन कामाची पाहणी करू लागल्याने आता पितळ उघडे पडणार हे लक्षात आल्याने अधिकाऱ्यांमध्ये अधिकाऱ्यांची पाचावर बसली आहे. बीड जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशनचे अंतर्गत जी बोगस प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले आणि त्यातून कोट्यावधी रुपयाची लूट केली. याचीही तपासणी आणि चौकशी ही समिती करू लागल्याने प्रशिक्षण घेणाऱ्या संस्थाचालक ही आता या समितीपासून पळ काढू लागले आहेत. तर यामध्ये ◀◀ पान ३ वर

### दलालांचीही पाचावर

या योजनेमध्ये दलाली करणारे अनेक जण अडचणीत आले असून प्रत्यक्ष पाहणी सुरू झाल्याने आता दलालांचीही पाचावर बसली आहे. विशेष म्हणजे ज्या संस्थांनी जलजीवन मिशनमध्ये जनजागृती चे काम केले तर काही संस्थांनी प्रशिक्षण दिले असे भासवून थातूरमातूर प्रशिक्षण देऊन कोट्यावधी रुपयाची लूट केली. आता ही लुटही बाहेर निघणार आहे. त्यामुळे यासाठी संस्थांची दलाली करणारे ही आता अडचणीत येणार असे दिसत आहे.



### चोरांच्या उलट्या बोंबा

केंद्राच्या पथकाने पैसे मागितल्याचा सूर आता अधिकारी काढत आहेत. मात्र प्रत्यक्ष कामच नसल्याने आणि उद्या हे पथक अहवाल दिल्यानंतर आपली हकालपट्टी होईल. या भीतीने केंद्रीय पथक पैसे मागते असी आवयीअधिकाऱ्यांनी उठवली आहे. हा प्रकार म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असाच आहे. प्रत्यक्ष काम नसतानाही कामे दाखवणे आता अधिकाऱ्यांना अंगलट येणार आहे.

### कामे पूर्ण होऊ नये पैसे नाहीत जिल्ह्यात

चालूअसलेल्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गतच्या पाण्याच्या टाक्या पाईपलाईन विहिरी यांचे काम अनेक गुप्तदारांनी प्रामाणिकपणे केलेले आहे अनेकांची कामे पूर्ण झाली मात्र त्यांना अद्याप पैसे मिळाले नाहीत ज्यांची कामे अपूर्ण आहेत त्यांना पैसे कशाच्या आधारावर दिले असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे ज्यांनी कामे पूर्ण केले त्यांना पैसे मिळणे गरजेचे जास्त नाही सहा महिने झाले तरी त्यांना अद्याप पैसे मिळाले नाहीत अशा गुत्तेदारांच्या अनेक तक्रारी आहेत

# आमदार साहेब, उघडा डोळे बघा नीट; पात्रुड-लवुळ रस्त्याची मिटवा किट किट

**पात्रुड । प्रतिनिधी**

**पात्रुडलवुळ हा तालुक्यातील शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यात खड्डा आहे का हे लक्षात येत नाही त्या मुळे हा रस्ता ओळखू न येण्याजोगा बनला आहे. ''आमदार साहेब उघडा डोळे, बघा नीट पात्रुडलवुळ रस्त्याची किटकिट अखेर मिटवा!'' असा संतापजनक स्वर नागरिकांकडून सातत्याने उमटत आहे.**





या मार्गाची दुर्दशा इतकी वाढली आहे की प्रत्यक्षात चालू रस्ता बंद पडल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. वाहनचालकांना वळणावळणाने पर्यायी पायवाटा वापराव्या लागत असून त्या देखील सुरक्षित नसल्याने प्रवास धोकादायक ठरत आहे. गावांमधील दळणवळण विस्कळीत होत असून विद्यार्थ्यांपासून ते व्यावसायिकांपर्यंत सर्वांनाच याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांसाठी तर ही स्थिती अधिकच वेदनादायी आहे. दुध, भाजीपाला, धान्य किंवा उस वाहतुकीसाठी हा मार्ग अत्यावश्यक आहे. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे माल वेळेवर पोहोचत नाही, तर अनेकदा वाहने चिखलात अडकून मोठे नुकसान होते. ''आमची अडचण तरी दूर करा; रोजचा रोज त्रास सहन करून ऊस आणि पीक कसे न्यायचे?'' अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

अपघातांचे प्रमाण देखील चिंताजनकरीत्या वाढले आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ''रोज एकतरी व्यक्ती अपघात होऊन दुखापत होत आहे.'' खोल खड्डे, रात्रीचा अंधार आणि अरुंद झालेली रस्त्याची जागा यामुळे दोनचाकी वाहनचालकांना सर्वाधिक ◀◀ पान ३ वर

# राज्यस्तरीय बैठकीला बहुसंख्येने उपस्थित रहा – दिनकर शिंदे

गेवराई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या विस्तारित कार्यकारणीची बैठक, बीड जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकारांचा सन्मान आणि स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी देवडी येथे होणार आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील सर्व डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.



वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत होत असलेल्या ◀◀ पान ३ वर

# सततच्या नापिकी, कर्जबाजारीपणाला कंटाळून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मनुरवाडी येथील तरुण शेतकऱ्यांनी सततच्या नापिकीला व बँकेच्या कर्जबाजारीपणाला कंटाळून औताच्या दोरीच्या साह्याने मनुरवाडी शिवारातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि ०८ डिसेंबर रोजी सकाळी ८:०० वाजण्याच्या सुमारास घडली असुन गणेश विठ्ठल थोरात (३४) वर्षं असे आत्महत्या करणाऱ्या तरुण शेतकऱ्यांचे नाव असून यासंदर्भात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.



यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार,तक्रारदार बिभीषण बबनराव थोरात वय (४८ ) रा.मनुरवाडी यांनी दि ११ डिसेंबर रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की,माजलगाव तालुक्यातील मनुरवाडी येथील माझा चुलत भाऊ तरुण शेतकरी गणेश विठ्ठल थोरात (३४) वर्षं याने दि.०८ डिसेंबर रोजी सकाळी ८:०० वाजण्याच्या पुर्वी वेळ नक्की नाही,मनुरवाडी शिवारातील केशव घुमरे यांचे शेतात बँकेचे कर्ज व सततच्या नापीकीला कंटाळुन नैराश्यात जावुन लिंबाचे झाडाला औत्याच्या दाव्याने गळफास घेवुन आत्महत्या केली म्हणुन माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यू क्रं.४४/२०२५ दाखल करून पोलीस निरीक्षक बालक कोळी यांच्या आदेशाने पुढील तपास साह्यक फौजदार बळवंते हे करत आहेत.

# आ. धस यांच्या पुढाकारामुळे पाटोद्यात ७३१७ शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यात अतिवृष्टी आणि ढगफुटीनंतर नुकसानभरपाईसाठी शेतकऱ्यांची ई-केवायसी मोठ्या प्रमाणात प्रलंबित होती. ही माहिती आमदार सुरेश धस यांच्यापर्यंत त्यांच्या स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांच्या माध्यमातून पोहोचताच धस यांनी तातडीने प्रशासनाला गावागावात विशेष कॅम्प आयोजित करण्याचे निर्देश दिले.

या पुढाकारानंतर प्रशासनाने जलद हालचाल करत केवळ सहा दिवसांत ७३१७ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली. सुरुवातीच्या ७७५२ प्रलंबित प्रकरणांपैकी आता फक्त ४३५ शेतकरी प्रलंबित आहेत. ही मोठी मोहीम यशस्वी करण्यासाठी तहसीलदार दत्तात्रय निलावार, विभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, नायब तहसीलदार अभयकुमार जोशी, श्रीनिवास मुळे, तसेच शासकीय अधिकारी बाळासाहेब मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.आ. सुरेश धस यांच्या पुढाकारामुळे पाटोदा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची नुकसानभरपाईची प्रक्रिया आता अधिक मार्गी लागली आहे.

# उसाला विनाकपात पहिली उचल तीन हजार रुपये द्या– ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती

चौसाळा । प्रतिनिधी

बीड व धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या पारगाव येथील भीमाशंकर शुगर साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येत भीमाशंकर कारखाना प्रशासनास ऊस दर जाहीर करण्याचे लेखी निवेदन दिले. निवेदनात यावर्षी गाळप होणाऱ्या ऊसाला विनाकपात पहिली उचल ३०००/-रुपये व अंतिम दर ४०००/- रुपये देण्यात यावा तसेच ऊस गाळपा नंतर १४ दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यावर बिल जमा करण्यात यावे. आदी.. प्रमुख मागण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने गुरुवारी दि.११डिसेंबर रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड ,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे ,भीमाशंकर कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी श्री.धनंजय मुळे, कैलास काका मुळे, भारत मुळे ,विशाल हागारे सह शेकडो शेतकऱ्यांनी एकत्र येत शेतकी अधिकारी श्री. कुलकर्णी साहेब यांना मागण्यांचे निवेदन सादर केले .येत्या २५ डिसेंबर पर्यंत ऊस दराचा तिढा सोडवावा अन्यथा भीमाशंकर साखर कारखान्याचे गाळप, ऊस तोडणी ,वाहतूक बंद करण्याच्या आंदोलनाचा आक्रमक इशारा देण्यात आला.




# लोकनेते मुंडेसाहेब यांच्या जयंतीनिमित्त आज भाजप कार्यालयातील रक्तदान शिबिरास उपस्थित रहावे–देशमुख

बीड । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्ताने बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हा कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असुन मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे

माणूस किती मोठा असतो हे त्याच्या पदाने नाही, तर त्याच्या लोकांवरील प्रेमाने ठरते आणि गोपीनाथरावजी मुंडे साहेब हे त्याचे जिवंत उदाहरण होते. सामान्य कार्यकर्त्यांच्या हक्कांसाठी लढणारा नेता, शेतकऱ्यांच्या वेदना जाणणारा शेतकऱ्याचा मुलगा, आणि नेहमी



लोकांसाठी झटणारा खरा जननेता.म्हणजे गोपीनाथ मुंडे साहेब अशा लोकनेत्याच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर आज शनिवार दि १३ डिसेंबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित केले आहे सकाळी १० वा या रक्तदान शिबिराला प्रारंभ होणार असून भाजप जिल्हा कार्यालय नाट्यगृह रोड चाणक्य पुरी बीड येथे शिबीर होणार आहे लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांनी आपले आयुष्य लोकांची वंचिताची सेवा करण्यासाठी घातले असून त्यांच्या जयंतीनिमित्त लोकांना जीवनदान देणारे रक्तदान शिबीर महत्वाचे आहे तरी जास्तीत जास्त कार्यकर्ते पदाधिकारी नेते यांनी रक्तदान करावे व जनतेला ही रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे



आज बीड ब्लड बँके मधे रक्ताचा तुटवडा आहे रक्तदान हीच लोकनेत्याला खरी श्रद्धांजली ठरेल असे आवाहन शंकर देशमुख यांनी केले आहे. या शिबिरास बीड विधानसभा भाजप नेते योगेश क्षिरसागर राज्य परिषद सदस्य ॲड सर्जेराव तांदळे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे शिवाजी मुंडे अजय सवई जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे शांतीनाथ डोरले अशोक लोढा अदित्य सारडा सौ सारीका क्षिरसागर इर्शाद भाई आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत

# मनोज चौधरी व इतरांवर कायदेशीर प्रतिबंधात्मक कार्यवाही करा

## आ. सुरेश धस यांच्या शेकडो समर्थकांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आणि विकासाभिमुख आमदार सुरेश धस यांच्या समाजमाध्यमावरून होत असलेल्या बदनामीप्रकरणी मनोविकृत प्रवृत्तीचा मनोज चौधरी व इतरांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी आ. धस यांच्या शेकडो समर्थकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेऊन संयुक्त निवेदन सादर केले.




आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य, नगराध्यक्ष, नगरसेवक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती-संचालक, भाजपा पदाधिकारी, सरपंच संघटना, दूध संघ चेअरमन, प्रतिष्ठित व्यापारी अशा विविध संस्थांचे शेकडो पदाधिकारी या निवेदनात सहभागी होते. या निवेदनावर तब्बल अडीचशे ते तीनशे पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की,आमदार सुरेश धस हे मराठवाडा भूषण असून गेली ३५ वर्षे जनतेच्या सेवेत प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. तथापि, मनोज चौधरी हा व्यक्ती व इतर काही लोक गेल्या अनेक दिवसांपासून समाज माध्यमांवर आ. धस यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचेल अशा अपशब्दांनी, बदनामीकारक प्रतिक्रिया, ◀◀ पान ३ वर

# करचुंडी येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

मौजे करचुंडी ता.जि. बीड येथे श्रीक्षेत्र नारायण गडाचे चौथे महंत वै.ह.भ.प. गोविंद बाबा यांच्या १५८ व्या पुण्यतिथी निमित्त दि. १३ डिसेंबर २०२५ पासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहा मधील दैनंदिन कार्यक्रम पुढील प्रमाणे होणार आहेत. पहाटे ४ ते ६ काकडा भजन,६ ते ७ विष्णु सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ जगद्गुरु तुकाराम महाराज गाथा भजन, दु.२ ते ५ भावार्थ रामायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ तसेच रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन व नंतर हरिजागर होईल.सदरील सप्ताहा मधील कीर्तनकार मंडळी पुढील प्रमाणे असणार आहेत. दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज भारती (बेलेश्वर संस्थान, बेलगाव) यांचे कीर्तन, १४ डिसेंबर रोजी श्री. ह.भ.प. हरी महाराज गवते (बेलूरा) यांचे कीर्तन, १५ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. सिद्धेश्वर महाराज गाडे (बेलुरा) यांचे कीर्तन, १६ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मंझरीकर यांचे कीर्तन, १७ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. भानुदास महाराज शास्त्री (श्रीराम संस्थान, गोमळवाडा) यांचे कीर्तन, व १८ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. गणेश महाराज लोंढे (माऊली संस्थान, भेंडटाकळी यांचे कीर्तन आणि दिनांक १९ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. पूज्य गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे (श्री बंकट स्वामी संस्थान, नेकनूर) यांचे कीर्तन होईल. तसेच सप्ताहाची सांगता दि. २० डिसेंबर,२०२५ रोजी श्री.ह.भ.प. पूज्य गुरुवर्य महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज (श्रीक्षेत्र नारायणगड संस्थान) यांचे सकाळी ११ ते दुपारी ०१ या वेळेत अमृततुल्य काल्याचे किर्तनाने होईल व नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळींच्या वतीने करण्यात येत आहे.

# मल्टिस्टेटच्या प्रॉपर्टी लिलावासाठी मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्धार

बीड । प्रतिनिधी

दिवाळीखोरीत निघालेल्या ज्ञानराधा, साईरामसह इतर मल्टिस्टेट प्रकरणात ठेवीदारांचा रोष वाढत आहे. येत्या महिनाभरात मल्टिस्टेटच्या प्रॉपर्टीच्या लिलावाची तारीख जाहीर न झाल्यास सोलापूर-धुळे महामार्ग बंद करण्याचा आणि थेट मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांनी दिला.

ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, माँ साहेब जिजाऊ तसेच इतर मल्टीस्टेट इतर पतसंस्थांतील अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात, जप्त मालमत्तांचा लिलाव तातडीने व्हावा या प्रमुख मागण्यांसाठी ठेवीदार संघर्ष कृती



समितीच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (दि.१२) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. प्रारंभी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेला जयंतीनिमित्त पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

मल्टिस्टेमधील गैरव्यवहारामुळे मराठवाड्यात ठेवीदारांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. अनेकांचे विवाह थांबले, शिक्षण अर्धवट राहिले. मात्र ठेवीदारांनी उभारलेल्या आंदोलनांमुळे शासन कामाला लागले असून स्वतंत्र उपजिल्हाधिकारी नियुक्त केल्याने तपासाला गती मिळाली आहे. ठेवीदांनी प्रत्येक आंदोलनात अशीच एकजुट दाखवावी असेआवाहन करण्यात आले. यावेळी येत्या महिनाभरात ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष


# पार्किंगमध्ये झाडू मारायला गेली; तोल जाऊन पाण्याच्या टाकीत पडली; महिलेचा दुर्दैवी मृत्यू



**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमधून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. झाडू मारत असतानाच पाण्याच्या टाकीत पडून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये (झ्रींपश –ललळवशपीं पशुी) कैद झाली आहे. काल (गुरूवारी, ता ११) सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड (झ्रींपश –ललळवशपीं पशुी) महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. तसेच महिलेचा मृतदेह टाकीतून बाहेर काढला. आशाबाई ढोणे (वय वर्ष ४६) असे मृत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना पिंपरी चिंचवड शहरातील डूडूळगाव परिसरातील यशदा स्प्लेंडर पार्क सोसायटीमध्ये घडली. सायंकाळच्या सुमारास आशाबाई या पार्किंग परिसरातून झाडू मारत होत्या. त्याचवेळी त्या खाली टाकीमध्ये पडल्या.

झाडू मारत आशाबाई पाण्याच्या टाकीजवळ गेल्या. पाण्याच्या टाकीला झाकण नव्हते. टाकीजवळ आशाबाई झाडू घेऊन उभ्या होत्या. अचानक एक पाय त्यांचा टाकीत गेला, ते थेट खाली कोसळल्या. पाण्याने भरलेल्या टाकीत पडल्याने आशाताईंचा गुदमरून मृत्यू झाला. त्यांनी मदतीसाठी हाक दिली. मात्र, मदत मिळण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. तसेच आशाबाई यांचा मृतदेह पाण्याच्या टाकीतून बाहेर काढला. तसेच शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवला. या घटनेनंतर ढोणे कुटुंबावर दुखा:चा डोंगर कोसळला आहे.

या धक्कादायक घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला आहे. साफसफाई करणाऱ्या या महिलेचा पाण्याच्या टाकीत पडून मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना डुडुळगाव येथील वहिलेनगर येथे घडली आहे. आशाबाई ढोणे असे या घटनेत मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. ढोणे या यशदा स्प्लेंडर पार्क येथील इमारतीत साफसफाईचे काम करण्यासाठी यायच्या. गुरुवारी दुपारी नेहमीप्रमाणे साफसफाईचे काम करीत असताना त्या पाण्याच्या टाकीत पडल्या. काही वेळाने सुरक्षारक्षक परिसरात पाहणी करीत असताना ढोणे या पाण्यात पडल्याचे समोर आले आहे. तात्काळ अग्निशमन दलाला याबाबत माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाल्यानंतर ढोणे यांना बाहेर काढले.

# सॅक्सोफोन आणि सतारच्या सुरांनी सवाईमध्ये मंत्रमुग्ध वातावरण

**पुणे । प्रतिनिधी**



सॅक्सोफोन म्हणजे पाश्चिमात्य वाद्य....पण, याच वाद्यावर जॉर्ज बुक्स यांनी भारतीय संगीताचे सूर छेडताच रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट केला तर जोडीला पं. कृष्णमोहन भट यांच्या सतार वादनाने रसिकांच्या हृदयाची तार छेडली.

सॅक्सोफोन या वाद्याचे स्वर सवाईमध्ये पहिल्यांदाच निनादले अन् रसिकांनी सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली. ७१ व्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाचा दुसरा दिवस गाजला तो जॉर्ज बुक्स यांच्या आणि पं. कृष्णमोहन भट यांच्या सतारच्या सहवादनाने. त्याचबरोबर खास आकर्षण ठरले ते युवा कलाकारांचे सादरीकरण. युवा गायक हृषीकेश बडवे यांच्या सुमधुर गायनाने अन् इंद्रायुध मजुमदार यांच्या सरोद वादनाने रसिकांची मने जिंकली. पद्मा देशपांडे यांच्या अनुभवी गायकीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रीडा संकुलात आर्य संगीत प्रसारक मंडळ आयोजित सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाचा दुसरा दिवस गाजला दिग्गज कलाकारांसह युवा कलाकारांमुळे. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात हृषीकेश बडवे यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यांनी राग गावतीमध्ये विलंबित झुमरा तालात 'खबर सब की' ही रचना सादर केली. त्याला जोडून द्रुत त्रितालातील 'शान ए ताजमहल' ही बंदिश सादर करीत त्यांनी रसिकांना स्वरानंद दिला.

त्यानंतर श्रीकल्याण रागात रूपक तालातील 'साहिब तुम करम करो' आणि मध्यलय त्रितालातील 'सावरिया अब तो हम तुम संग' या दोन बंदिशी सादर केल्या. हृषीकेश यांनी सादर केलेल्या सर्व बंदिशी त्यांचे गुरू पं. विजय बक्षी यांच्या होत्या. रसिकांच्या आग्राहाखातर हृषीकेश यांनी 'घेई छंद मकरंद' हे नाट्यपद दमदारपणे पेश केले. त्यानंतर युवा सरोदवादक इंद्रायुध मजुमदार यांनी राग श्रीमध्ये आलाप, जोड, झाला अशा क्रमाने वादन करत, रागाचे जणू स्वरचित्र रेखाटले. सरोदचा धीरगंभीर नाद मंडपात भरून राहिला. त्यांनी राग मांजखमाजमधील उस्ताद अल्लाउद्दीन खाँसाहेब यांच्या दोन रचना पेश केल्या. द्रुत लयीतील या वादनात तबलावादक ईशान घोष यांच्यासह सवाल जवाब विलक्षण रंगले. यानंतर महोत्सवाच्या उत्तरार्धात ज्येष्ठ गायिका पद्मा देशपांडे यांनी राग शामकल्याण सादर केला. 'जियो मेरो लाल' हा पारंपरिक ख्याल त्यांनी दमदारपणे पेश केला. त्रितालात निबद्ध 'रघुनंदन खेलत' ही स्वरचित बंदिशही त्यांनी सादर केली.सोहनीबहार रागातील 'नाथ देहो मोहें' ही एकतालातील बंदिश त्यांनी ऐकवली. संगीत स्वयंवर या नाटकातील 'करीन यदुमनी सदना' या नाट्यपदाने त्यांनी विराम घेतला. ज्येष्ठ सॅक्सोफोनवादक जॉर्ज बुक्स आणि सतारवादक पं. कृष्ण मोहन भट या कलाकारांचे सॅक्सोफोन आणि सतार सहवादन हा आजच्या महोत्सवाचा एक अप्रतिम स्वरानुभव ठरला. राग चारुकेशीच्या माध्यमातून या दोन्ही सिद्धहस्त कलाकारांनी आपापल्या वाद्यांवरील प्रभुत्व, वाद्यांच्या सौंदर्य निर्मितीच्या विविध शक्यतांचा स्वरपट रूपक तालाच्या साथीने उलगडत नेला. सतारीचे नाजुक झंकार सॅक्सोफोनच्या गंभीर नादाशी एकरूप होऊन गेले होते.

# निलेश घायवळ हजर झाला नाही तर सर्व मालमत्ता जप्त करणार, पोलिसांचा थेट इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड निलेश घायवळ याला पुण्यातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने फरार घोषित केले आहे. बनावट कागदपत्रे वापरून पासपोर्ट मिळवत लंडनला पळून गेलेल्या घायवळवर दाखल असलेल्या तीन गुन्ह्यांच्या चार्जशीटमध्ये पोलिसांनी त्याला फरारी घोषित केले आहे. आता ३० दिवसांत तो स्वतः न्यायालयात हजर झाला नाही तर त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

न्यायाधीश के. पी. जैन यांच्या न्यायालयात सादर करण्यात आलेल्या चार्जशीटमध्ये घायवळच्या फरारी स्थितीचा उल्लेख असून, या निर्णयामुळे त्याच्या बेकायदेशीर मालमत्तेवर पोलिसांची कधीही कारवाई होऊ शकते, असे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले. घायवळवर एकूण १२ हून अधिक गुन्हे दाखल असून, त्यात खंडणी उकळणे, गोळीबार, कोयता हल्ला आणि मकोका कायद्यांतर्गत कारवाईचा समावेश आहे.

कोथरूड भागात त्याच्या टोळीने दहशत



निर्माण करून जमीन खरेदी-विक्रीचे बेकायदेशीर व्यवहार केल्याचा संशयही पोलिसांनी व्यक्त केला आहे. यापूर्वीच पोलिसांनी घायवळची १० बँक खाती गोठवली असून, त्यात सुमारे ३ कोटी रुपयांचा व्यवहार सील करण्यात आला आहे. तसेच, त्याच्या मालकीच्या तीन गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

घरातून काडतुसे, पुंगळ्या, ६० हजार रोख रक्कम, १० तोळे सोने आणि पुणे, मुळशी, जामखेड, धाराशिव जिल्ह्यातील जमिनींच्या खरेदीखती जप्त झाल्या आहेत. घायवळने आडनावात फेरफार करून (घायवळ ऐवजी गायवळ) पासपोर्ट मिळवल्याचा संशय असून, त्याच्या कुटुंबीयांच्या आणि नातेवाईकांच्या मालमत्तेवरही सील करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कारवाईमुळे घायवळच्या गुन्हेगारी कारवायांना आर्थिक धक्का बसणार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. घायवळ टोळीशी अमली पदार्थांच्या व्यापाराचा संबंध असल्याची चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली असून, पोलिसांनी त्याच्या फरार सदस्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. घायवळला पकडण्यासाठी 'लूक आऊट' नोटीस जारी करण्यात आली असून, परदेशी पोलिसांशी समन्वय साधला जात आहे.

# अपहरण करून खंडणी उकळणारे तीन आरोपी अटकेत, विधीसंघर्षित मुलगी ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या पथकाने अपहरण, मारहाण आणि गंभीर गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देऊन खंडणी उकळणाऱ्या टोळीला गजाआड केले आहे. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आले असून विधीसंघर्षित मुलीस ताब्यात घेण्यात आले आहे.

अक्षय गंगाधर बुधेवार ( २२, रा. गोकळनगर, कात्रज) , अमोल अंकश शिंदे ( २८, रा. कर्वेनगर, कोथरूड,) आणि राहुल तानाजी शितोळे ( २३, रा. लंबोदर अपार्टमेंट, शेलार मळा, कात्रज) अशी अटक आरोपींची नावे आहेत. तसेच या गुन्ह्यातील विधीसंघर्षित मुलीसही ताब्यात घेण्यात आले आहे. फिर्यादी प्रकाश दिनकर जोरी ( २८, भुगाव ) याला ०७ डिसेंबर रोजी रात्री कात्रज चौकात समाज माध्यमातील




ओळखीच्या मुलीने बोलावून घेतले होते. त्यानंतर ती त्याला सोबत घेऊन कात्रज घाटाकडे गेली. तेथे तिचे साथीदार असलेल्या आरोपींनी फिर्यादीला अडवून जबरदस्तीने येवलेवाडी येथे नेले व तिथे अक्षय शेलार आणि त्याचे दोन साथीदारही आले.सर्व आरोपींनी मिळून फिर्यादीला शिवीगाळ, मारहाण करत त्यांच्यावर पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. हा खोटा गुन्हा दाखल करू नये म्हणून त्यांनी ७० हजार रुपये खंडणीची मागणी केली. त्यापैकी १० हजार रोख रक्कम जबरदस्तीने घेतली व उर्वरित रकमेसाठी सतत फोन कॉल करून दबाव टाकला.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांनी विशेष पथक तयार करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार महेश बारवकर, मंगेश पवार, मंगेश गायकवाड, तुकाराम सुतार हे आरोपींचा शोध घेत होते. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी आरोपींना कात्रज परिसरातून बुधवारी रात्री अटक केली. ही कारवाई पोलीस उप आयुक्त मिलिंद मोहीते, सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे, सपोनि स्नेहल थोरात, उपनिरीक्षक निलेश मोकाशी, तसेच नागेश पिसाळ, महेश बारवकर, मंगेश पवार, नयनाथ खताळ, मंगेश गायकवाड, तुकाराम सुतार, किरण साबळे, मितेश चोरमोले, संदीप आगळे, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, सागर बोरगे यांच्या पथकाने केली. पोलीसांनी आवाहन केले आहे की, अशा प्रकारची फसवणूक किंवा खंडणीची घटना कोणासोबत घडली असल्यास त्यांनी त्वरित पोलीस ठाण्यात कळवावे. यातील आरोपींवर सासवड पोलीस ठाण्यात असा एक गुन्हा दाखल आहे.

# सागर सूर्यवंशी यांचे फ्लेक्स काढले! विरोधकांना कसली भीती!

**प्रभाग क्रमांक ९ मध्ये निवडणूक तारखा जाहीर होण्याआधीच विरोधकांना धाकधुक! नागरिकांनी लावलेले सागर सूर्यवंशी यांचे फ्लेक्स प्रशासनाने काढले की विरोधकांनी?**

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

नेहरूनगर राळवाडी महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये भारतीय जनता पार्टीकडून प्रभावशाली इच्छुक उमेदवार सागर गोपाळ सुर्यवंशी यांना प्रभागातून विविध संस्था संघटना, मित्र परिवार, मित्र मंडळे आणि सामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रभागातील स्थानिक मित्र आणि कार्यकर्त्यांकडून पत्रकार सागर सूर्यवंशी यांच्या नावाची शिफारस प्रभावीपणे उमेदवार म्हणून केली जात असून परिणामी विरोधकांमध्ये धाकधुक वाढत चालली असून प्रभागातील सागर सूर्यवंशी यांना पाठिंबा असल्याचे फ्लेक्झ बॅनर विरोधकांनी प्रशासनाला हाताशी धरून काढण्याचे कृत्य केल्याची चर्चा प्रभागामध्ये सुरू आहे.

भाजपचे प्रभावशाली दावेदार उमेदवार म्हणून स्थानिक नागरिकांनी पत्रकार सागर सूर्यवंशी यांचे नाव पुढे केल्यामुळे आणि नागरिकांनीच स्वयंस्पूर्तीने सागर सूर्यवंशी यांचे फ्लेक्स लावल्यामुळे विरोधकांमध्ये धाक धुक वाढली असल्याने असे कृत्य प्रशासनाला तक्रारी




करून केले असल्याचा दावा खराळवाडी येथील मित्र मंडळे करीत आहेत. आत्तापासूनच सागर सूर्यवंशी यांना जनतेचे वाढता पाठिंबा मिळत असल्याचा हा परिणाम असून लावलेले फ्लेक्स काढल्याने सागर सूर्यवंशी यांचा प्रभाव कमी होणार नाही असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले. सागर सूर्यवंशी यांचे हिंदुत्वाचे कार्य आणि भारतीय जनता पार्टीच्या वेगवेगळ्या विंग चे कार्य पाहता प्रभाग क्रमांक ९ मधून सागर सूर्यवंशी हेच योग्य उमेदवार असल्याची चर्चा सध्या प्रभागात सुरू आहे.


# निलेश घायवळ हजर झाला नाही तर सर्व मालमत्ता जप्त करणार, पोलिसांचा थेट इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड निलेश घायवळ याला पुण्यातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने फरार घोषित केले आहे. बनावट कागदपत्रे वापरून पासपोर्ट मिळवत लंडनला पळून गेलेल्या घायवळवर दाखल असलेल्या तीन गुन्ह्यांच्या चार्जशीटमध्ये पोलिसांनी त्याला फरारी घोषित केले आहे. आता ३० दिवसांत तो स्वतः न्यायालयात हजर झाला नाही तर त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. न्यायाधीश के. पी. जैन यांच्या न्यायालयात सादर करण्यात आलेल्या चार्जशीटमध्ये घायवळच्या फरारी स्थितीचा उल्लेख असून, या निर्णयामुळे त्याच्या बेकायदेशीर मालमत्तेवर पोलिसांची कधीही कारवाई होऊ शकते, असे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले. घायवळवर एकूण १२ हून अधिक गुन्हे दाखल असून, त्यात खंडणी उकळणे, गोळीबार, कोयता हल्ला आणि मकोका कायद्यांतर्गत कारवाईचा समावेश आहे.

कोथरूड भागात त्याच्या टोळीने दहशत निर्माण करून जमीन खरेदी-विक्रीचे बेकायदेशीर व्यवहार केल्याचा संशयही पोलिसांनी व्यक्त केला आहे. यापूर्वीच पोलिसांनी घायवळची १० बँक खाती गोठवली असून, त्यात सुमारे ३ कोटी रुपयांचा व्यवहार सील करण्यात आला आहे. तसेच, त्याच्या मालकीच्या तीन गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

घरातून काडतुसे, पुंगळ्या, ६० हजार रोख रक्कम, १० तोळे सोने आणि पुणे, मुळशी, जामखेड, धाराशिव जिल्ह्यातील जमिनींच्या खरेदीखती जप्त झाल्या आहेत. घायवळने आडनावात फेरफार करून (घायवळ ऐवजी गायवळ) पासपोर्ट मिळवल्याचा संशय असून, त्याच्या कुटुंबीयांच्या आणि नातेवाईकांच्या मालमत्तेवरही सील करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कारवाईमुळे घायवळच्या गुन्हेगारी कारवायांना आर्थिक धक्का बसणार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. घायवळ टोळीशी अमली पदार्थांच्या व्यापाराचा संबंध असल्याची चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली असून, पोलिसांनी त्याच्या फरार सदस्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. घायवळला पकडण्यासाठी 'लूक आऊट' नोटीस जारी करण्यात आली असून, परदेशी पोलिसांशी समन्वय साधला जात आहे.


# शिवणे- नांदेड पूल रस्ता शनिवारी रात्री वाहतुकीसाठी बंद

शिवणे : शिवणे परिसरातील महावितरणतर्फे नवीन विद्युत वाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात येत असून, यासाठी मारुती मंदिर, शिवणे ते नांदेड पूल हा रस्ता शनिवार रात्रीपासून रविवारी पहाटेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करावा, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली आहे.



याबाबत माहिती देताना शिवणे येथील महावितरणचे सहाय्यक अभियंता यांनी सांगितले की, शिवणे, वारजे, कोंढवे-धावडे, उत्तमनगर, न्यू कोपरे, गावातील वीजपुरवठा परिस्थिती सुधारण्यासाठी नवीन विद्युत वाहिनी टाकण्याचे काम नियोजित करण्यात आले आहे. यासाठी शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजेपासून ते रविवारी सकाळी ६ वाजेपर्यंत काम करण्यात येणार आहे. मारुती मंदिर, शिवणे ते नांदेड पूल या मार्गावर काँक्रीट रस्ता खोदून भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्याचे काम होणार असल्यामुळे या काळात संपूर्ण रस्ता बंद ठेवण्यात येईल. रस्ता अरुंद असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने कामाच्या दोन्ही बाजूंना बॅरिगेट्स लावण्यात येणार आहेत. वाहनचालकांनी तसेच नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कामादरम्यान नागरिकांना संभवणारी असुविधा टाळण्यासाठी ही आगाऊ सूचना देण्यात आली असून, शिवणे, वारजे, कोंढवे-धावडे, उत्तमनगर, न्यू कोपरे, नांदेड, खडकवासला, धायरी, किरकटवाडी परिसरातील नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असेही महावितरणतर्फे सांगण्यात आले. महावितरणने काम सुरळीत पार पाडण्यासाठी आणि परिसरातील वीजपुरवठा सुधारण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळ्यात अनेकांची नावं समोर येणार, तहसीलदारांचा खळबळजनक खुलासा

**पुणे । प्रतिनिधी**

मुंढवा येथील कोट्यवधी रुपयांच्या शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. निलंबित तहसीलदार सुर्यकांत येवले यांनी पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे तब्बल ८ ते १० तासांच्या चौकशीत धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांनी सांगितले की, मुंढवा सर्व्हे नंबर ८८ मधील सुमारे ४० एकर शासकीय जमीन बोटॅनिकल गार्डनला खाली करण्याचे पत्र पाठवण्यासाठी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा प्रचंड दबाव होता.


ही जमीन सरकारने बोटॅनिकल गार्डनला ५० वर्षांच्या कराराने दिली आहे. सद्यस्थितीत या जागेचे बाजारमूल्य अंदाजे १,८०० कोटी रुपये आहे. मात्र, शीतल तेजवानी हिने ही जमीन मूळ महार वतनदारांची असल्याचा दावा करत अमेडिया एंटरप्रायजेस या कंपनीला अवघ्या ३०० कोटी रुपयांत विकल्याचा व्यवहार केला. त्यानंतर अमेडिया कंपनीच्या दबावाखाली तहसीलदार येवले यांनी २६ मे २०२५ रोजी बोटॅनिकल गार्डनला जागा खाली करण्याचे पत्र पाठवले होते. चौकशीत येवले यांनी कबूल केले की, हे पत्र पाठवण्यासाठी प्रशासनातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांच्यावर सतत दबाव टाकला आणि वारंवार फोनही केले. सूत्रांच्या माहितीनुसार, त्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर सत्ताधारी पक्षातील एका प्रभावशाली राजकीय नेत्याचा दबाव असल्याची चर्चा पोलिस दलात जोरदार आहे. या खुलाशामुळे आता त्या वरिष्ठ अधिकाऱ्याची चौकशी होण्याची आणि प्रकरणात अनेक बड्या नावांचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# स्वत:च्याच 'श्रद्धांजली'चा स्टेटस अन् ६ दिवसांचा सस्पेन्स! निखिल रणदिवे अखेर घरी परतले

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

यवत पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस नाईक निखिल कैलास रणदिवे याने स्वतःच्या श्रद्धांजलीची पोस्ट, मुलीला वाढदिवसाच्या पहिल्या व शेवटच्या शुभेच्छा तसेच आत्महत्या करत असल्याची सुसाईड नोट टाकून बेपत्ता झाला होता. तो सुखरूप घरी परतल्याची माहिती शिक्रापूर पोलिसांनी दिली आहे.

पोलीस नाईक निखिल रणदिवे (वय ३३, सध्या रा. ज्ञानमंजुळा सोसायटी, शिक्रापूर) याची ५ डिसेंबर रोजी यवत येथून शिक्रापूर येथे बदली झाली होती. मात्र, यवतचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख हे कार्यमुक्त न करता जाणीवपूर्वक मानसिक त्रास देत असल्याचा आरोप त्याने केला होता. मुलगी आजारी असताना





आणि तिचा वाढदिवस असतानाही सुट्टी मंजूर न केल्याने त्रस्त होऊन रणदिवे यांनी स्टेटसला 'भावपूर्ण श्रद्धांजली' असे टाकून, पोलीस निरीक्षकांच्या त्रासाला कंटाळून जीवन संपवत असल्याचे सांगून ते बेपत्ता झाले.याबाबत बेपत्ता पोलीस नाईक निखिल रणदिवे यांचा भाऊ अक्षय कैलास रणदिवे (वय ३०) यांनी शिक्रापूर पोलिसात खबर दिली होती.

त्यानंतर पोलीस दलात खळबळ उडाली आणि यवतसह शिक्रापूर पोलीस, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळे पथक निखिलचा शोध घेत होते. अखेर, ११ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास बेपत्ता झालेले पोलीस नाईक निखिल रणदिवे घरी परतले. शिक्रापूरचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड आणि पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे यांनी घरी जाऊन निखिलची भेट घेतली. पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे यांनी सांगितले की, निखिल रणदिवे नुकताच घरी परतला असल्याने दोन दिवसांनी त्याचा सविस्तर जबाब नोंदवला जाईल.